www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १३ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरूवार १६ मे २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात

### CAA अंतर्गत 14 जणांना मिळाले भारतीय नागरिकत्व, केंद्रीय गृह सचिवांनी दिली प्रमाणपत्रे



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

CAA लागू केल्यानंतर केंद्र सरकारने पहिल्यांदाच 14 लोकांना त्याचे फायदे दिले आहेत. गृह मंत्रालयाने याची पुष्टी केली आहे, बुधवारी केंद्रीय गृह सचिवांनी 14 लोकांना नागरिकत्व प्रमाणपत्रे सुपूर्द केली, जे भारतीय नागरिकत्व मिळविण्यासाठी वर्षानुवर्षे संघर्ष करत होते. पान २ वर

### लग्न बीडमध्ये, बिंग फुटले रत्नागिरीत; पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल



● रत्नागिरी, दिगंबर जाधव :

बीड येथे अल्पवयीन मुलीशी लग्न करुन रत्नागिरीत आलेल्या जोडप्याचे बिंग अखेरीस फुटले. तरुणीने घरगुती वादातून झोपेच्या गोळ्या घेतल्या आणि तिला जिल्हा शासकीय रुणालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर तपास केला असता सारा प्रकार समोर आला. पान २ वर

# तुमची स्वप्ने, माझा संकल्प

## ४ जूननंतरही याच ताकदीने काम करणार, पंतप्रधान मोदींचं जनतेला आश्वासन



● कल्याण, यश सावंत :

तुमची स्वप्ने मोदींचा संकल्प, 4 जूननंतरही याच ताकदीने आणि मेहनतीने काम करणार, असं आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला दिलं आहे. श्रीकांत शिंदे, कपिल पाटील आणि नरेश म्हस्केंच्या प्रचारासाठी कल्याणमध्ये पंतप्रधान मोदींची सभा आयोजित करण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या या भूमीला माझा नमस्कार, असं म्हणत पंतप्रधान मोदींनी भाषणाची मराठीतून सुरुवात केली. पान २ वर

### काँग्रेसने हे पाप केलं

“पंतप्रधान मोदी यांनी यावेळी काँग्रेसला लक्ष्य करताना म्हणाले, हिदू आणि मुस्लिम असा भेदभाव केलं तर देशाला काही फायदा आहे का? हिंदूसाठी इतकं आणि मुस्लिमांना इतकं हे पाप काँग्रेस करत होती. मी स्वत: याचा विरोध केला होता. ते सत्तेत आले तर हेच करणार. आपल्या देशाला एकत्र ठेवायचं आहे. अशा पद्धतीने वागणं चांगलं आहे का? महाराष्ट्रात यांचा एकही उमेदवार येता कामा नये. झालेल्या निवडणुकीत काँग्रेसला चारी मुंड्या चीत केलं आहे. सर्व मुसलमान ओबीसी आहेत, आरक्षणात पण गडबड केली. आता पुन्हा निवडून आले तर तेच करतील. हिंदुस्तानच्या विविधतेत एकता आहे. जोपर्यंत हे सत्तेमध्ये होते, तेव्हा कसा देश चालवला होता. कुठलीही गोष्ट आणि ठिकाण सुरक्षित नव्हतं. आतंकवादी सहज त्रास देत होते, पण काँग्रेस काय करत होती.

## ...तर दामोदर हॉलसाठी उपोषणाला बसू - प्रशांत दामले




● मुंबई, विशाल पाटील :

परळ येथील दामोदर हॉल, सहकारी मनोरंजन मंडळ आणि सोशल सर्व्हिस लीगच्या लढाईत आता अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेनेही उडी घेतली आहे. २८ मे पर्यंत योग्य पाऊल उचलले नाही तर दामोदर हॉलसाठी उपोषणाला बसणार असल्याचा ईशारा नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे. सोशल सर्व्हिस लीग संस्थेच्या जागेवर असलेल्या दामोदर हॉल आणि सहकारी मनोरंजन मंडळाचे प्रकरण नोव्हेंबर २०२३ पासून ऐरणीवर आहे. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर आणि प्रवीण दरेकर यांनी भेट दिल्यानंतर दामोदर हॉलच्या पडकामाला स्थगिती देण्यात आली होती. पान २ वर

## उच्च न्यायालयाने नेमलेली खारफुटी समितीही करणार डीपीएस तलाव बंधाऱ्याची पाहणी

● नवी मुंबई, भावना जैन :



डीपीएस तलावाला लागून असलेल्या सीआरझेड १ क्षेत्रावरील ६०० मीटर बेकायदेशीर बंधाऱ्याबाबत पर्यावरणवाद्यांच्या तक्रारीवरून केंद्राने महाराष्ट्र सागर किनारा व्यवस्थापन प्राधिकरणाला चौकशी करण्याचे दिलेले निर्देश ताजे असतानाच आता ‘नॅटकनेक्ट फाउंडेशन’च्या तक्रारीवरून मुंबई उच्च न्यायालयाने नेमलेली खारफुटी समितीही येत्या २९ मे रोजी या तलावास भेट देणार आहे. यामुळे हा बंधारा बांधणारा ठेकेदार आणि सिडकोचा पाय आणखी खोलात गेला आहे.

सिडकोने बांधलेला ६०० मीटर लांबीचा हा बंधारा आता ३० एकरावरील या तलावात येणारा भरतीच्या पाण्याचा प्रवाह रोखणारा कच्चा रस्ता बनला आहे. तो एका बाजूला खारफुटी आणि दुसरीकडे पाणथळ जमीन कापतो. हे सरळसरळ सीआरझेड १ नियमांचे स्पष्ट उल्लंघन असल्याचे ‘नॅटकनेक्ट’चे संचालक बी. एन. कुमार यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्रालयानेही दिले आहेत चौकशीचे निर्देश गेल्याच आठवड्यात केंद्रीय वने आणि पर्यावरण मंत्रालयाने ‘एमसीझेडएमए’ला डीपीएस तलावास भेट देऊन वस्तुस्थिती तपासून अहवाल देण्यास सांगितले आहे. पान २ वर

### जोगन्नाचा मृत्यू नक्षलवाद्यांच्या जिव्हारी

## ३० मे रोजी गडचिरोली बंदचे आवाहन

● गडचिरोली, सचिन कदम :






छत्तीसगडमधील अबुझमाडच्या जंगलात झालेल्या चकमकीत ठार झालेला नक्षल नेता जोगन्ना व इतर सहकाऱ्यांच्या स्मरणार्थ नक्षलवाद्यांनी ३० मे रोजी गडचिरोली बंदचे आवाहन केले आहे. यासंदर्भात नक्षल्यांच्या दांडकारण्य पश्चिम सबझोनल समितीचा प्रवक्ता श्रीनिवास याने नुकतेच एक पत्रक काढले आहे.

गडचिरोलीपासून १५ ते २० किलोमीटर अंतरावरील नारायणपूरच्या कांकेर सीमावर्ती भागात महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला छत्तीसगड पोलीस व नक्षलवाद्यांत चकमक झाली होती. यात ठार झालेल्या दहा नक्षलवाद्यांत जहाल नक्षलवादी जोगन्ना, विनय, मलेश, सिंधू गावडे, सरिता जेट्टी आणि शिल्का यांचा समावेश होता. गडचिरोलीतील अनेक घातपाती कारवायांमध्ये या सर्वांचा प्रत्यक्ष सहभाग होता. जोगन्नावर गडचिरोलीत शंभरहून अधिक गुन्हे दाखल होते. पान २ वर

> नक्षलवाद्यांनी पत्रकातून ३० मे रोजी बंदचे आवाहन केले आहे. मात्र, जिल्ह्यात सुव्यवस्था अबाधित राखून हा बंद हाणून पाडण्यासाठी पोलीस दल सक्षम आहे. नक्षल्यांच्या सर्व हालचालींवर कसून लक्ष आहे. त्यांचे मनसुबे कदापि यशस्वी होऊ देणार नाहीत.
>
> - नीलोत्पल, पोलीस अधीक्षक

## अनधिकृत फलक हटवण्यास सुरुवात

### ■ महानगरपालिकेकडून मध्य व पश्चिम रेल्वेला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत नोटीस



● मुंबई, विशाल कारंडे :

मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या हद्दीतील नियमबाह्य आकाराचे म्हणजे ४० फूट बाय ४० फूटपेक्षा अधिक आकाराचे सर्व जाहिरात फलक रेल्वे प्रशासनाने तातडीने हटवावेत, या आशयाची नोटीस मुंबई महानगरपालिका प्रशासनाने रेल्वे प्रशासनाला पाठवली आहे. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत मुंबई जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष या नात्याने अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी ही नोटीस बजावली आहे.

घाटकोपरमधील छेडानगर परिसरातील महाकाय जाहिरात फलक कोसळून दुर्घटना घडल्यानंतर पालिका प्रशासनाने मुंबईतील सर्व फलकांवर कारवाई करण्याचे ठरवले आहे. त्याअंतर्गत मध्य आणि पश्चिम रेल्वे प्रशासनाला नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार मुंबईत फक्त ४० फूटापर्यंत लांबी रुंदी असलेल्या फलकांनाच परवानगी दिली जाते. पान २ वर

## रेल्वेचा फेरीवाल्यांवर दंडुका! खाद्यपदार्थ अन् पाण्याच्या बाटल्यांच्या विक्रीवरही नजर

● पुणे, अभिजित येरल्लू :



रेल्वे गाड्या आणि स्थानकांमध्ये अनधिकृत फेरीवाले मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. या अनधिकृत फेरीवाल्यांकडून प्रामुख्याने खाद्यपदार्थांची विक्री केली जात आहे. हे खाद्यपदार्थ चांगल्या दर्जाचे नसल्यामुळे प्रवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आता रेल्वे सुरक्षा दलासह वाणिज्य विभागाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई सुरू केली आहे. यामध्ये ५६० फेरीवाल्यांना पकडून त्यांच्याकडून तीन लाखांहून अधिक दंड वसूल करण्यात आला आहे.

मध्य रेल्वेमध्ये रेल्वे सुरक्षा दल आणि रेल्वेच्या वाणिज्य विभागाने गाड्या, स्थानके आणि फलाटावर अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध कारवाईची मोहीम राबवली. त्यात पुणे, दौंड, मिरज, सातारा, अहमदनगर, कोपरगाव, बेलापूर या प्रमुख स्थानकांवर कारवाई करण्यात आली. पान २ वर

## आठ दिवसात स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल सादर करा; महापालिकेने दिले बैठकीत निर्देश

● ठाणे, रोहित जैसवाल :




मुंबईत होर्डींग्ज पडून झालेल्या दुर्घटनेनंतर आता ठाणे महापालिकेला जाग आली आहे. त्यानुसार ठाण्यात अशा प्रकारची हानी होऊ नये या दृष्टीने बुधवारी महापालिकेच्या माध्यमातून ठाण्यातील जाहीरातदारांची (होर्डींग्ज) बैठक घेण्यात आली.

या बैठकीत पुढील आठ दिवसात स्ट्रक्चरल ऑडीटचा अहवाल सादर करण्याचे निर्देश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी दिले आहेत. तसेच होर्डींग्ज बाबत जी नियमावली ठरवून देण्यात आली आहे. त्याचे पालन करण्याच्या सुचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत.

ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रोडे यांच्या उपस्थितीत महापालिका मुख्यालयात ही बैठक घेण्यात आली. या बैठकीत हे निर्देश देण्यात आले आहे. महापालिका हद्दीत आजच्या घडीला ३०० च्या आसपास होर्डींग्ज आहेत. परंतु ९० ठिकाणी दिलेल्या परवानगी पेक्षा अधिकच्या आकाराचे म्हणजेच ओव्हरसाईज होर्डींग्ज उभारण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यात मुंबईत घडलेल्या घटनेनंतर आता महापालिकेला जाग आली आहे. त्यानुसार ज्या ज्या जाहीरादारांनी ओव्हरसाईज होर्डींग्ज उभारले आहे. त्यांनी ते आठ दिवसाच्या आत नियमात आणावे अन्यथा कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यापूर्वी देखील स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. परंतु आता पुन्हा पुढील आठ दिवसात ऑडिट अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय जाहीरात धोरणातील नियमांचे पालन करावे अशा सुचनाही यावेळी देण्यात आल्या आहेत. पान २ वर

## व्हेरिफिकेशन अभावी अडकले ५ हजार पासपोर्ट

● नागपूर, नितीन देवळेकर :




नॉर्मल पासपोर्टसाठी अर्ज करणाऱ्यांच्या कागदपत्रांचे व्हेरिफिकेशन झाल्यानंतर पासपोर्ट ऑफिसकडून ते पडताळणीसाठी पोलिसांकडे पाठविले जातात. मात्र, अर्ज करणाऱ्यांची माहिती पोलिसांना मिळेनासी झाल्याने नागपूर विभागाच्या पासपोर्ट कार्यालयांतर्गत गेल्या दीड महिन्यात सुमारे ५ हजार पासपोर्ट अडकून पडले आहेत.

त्यामुळे अत्यावश्यक काम असूनही संबंधित नागरिक विदेशवारीपासून वंचित झाले आहेत.

या समस्येचे मूळ कारण टीसीएस कंपनीचे नवीन सॉफ्टवेअर आहे.त्यामुळेच नागरिकांना त्रास होत आहे. पासपोर्ट सेवा कार्यक्रम अपग्रेड करण्यात आला असून, पायलट प्रोजेक्ट अंतर्गत नागपूर आणि भूवनेश्वरमध्ये १ एप्रिल २०२४ पासून तो सुरू करण्यात आला आहे.

सॉफ्टवेअर इंटरफेसच्या डेव्हलपमेंट आणि फंक्शनिंगची जबाबदारी टीसीएसकडे आहे. मात्र, जे सॉफ्टवेअर अपग्रेड करण्यात आले ते व्यवस्थित चालत नाही. योग्य प्रकारे टेस्ट न करताच ऑनलाइन करण्यात आले. त्यामुळे सुरुवातीपासूनच यात तांत्रिक अडचणी येत आहेत. पान २ वर

## संपादकीय

# मुजोर, मग्रूर

लखनऊ सुपर जायंट्स या इंडियन प्रीमियर लीगमधील नवथर फ्रँचायझीचे मालक संजीव गोएंका हे स्वतः बहुधा निष्णात क्रिकेटपटू असावेत. पण ते गंभीर, स्पर्धात्मक क्रिकेट किती खेळले, याविषयी नोंदी उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्या आघाडीवर इच्छा असूनही भरभरून लिहावे असे हाती काही लागत नाही. तसे पाहता या देशात निष्णात क्रिकेटपटू कोट्यवधी आढळतील. पण त्यांतील बहुतांनी क्रिकेट खेळण्या ऐवजी क्रिकेट 'पाहणे' आणि क्रिकेट 'बोलणे' यालाच आयुष्याचे ईप्सित मानले आणि या खेळावर अनंत उपकार केले. संजीव गोएंका याच संस्कृतीचे प्रतिनिधी. आपल्याकडे चावडीपासून दिवाणखान्यापर्यंत आणि कॉलेज कट्ट्यापासून मद्यालयापर्यंत बैठकांमध्ये क्रिकेटचे बोधामृत पिण्या- पाजण्याची परंपरा जुनी. विनू मंकडला चेंडूला उंचीच देता येत नव्हती.. पतौडी फिल्डर चांगला होता पण डायरेक्ट थ्रो जमत नव्हता.. हाणामारी हा गावस्करचा प्रांतच नव्हता.. कपिलदेव रिव्हर्स स्विंग कुठे करायचा.. तेंडुलकर खेळतो पण बाकीचे मुद्दाम विकेट फेकतात.. इत्यादी इत्यादी बारकाव्यांवर अधिकारवाणीने मतप्रदर्शन करण्यात, राष्ट्रीय नसलेल्या खेळावर राष्ट्रीय वेळ व्यतीत करणाऱ्या पिढ्यान् पिढ्या या देशात होऊन गेल्या. या सगळयांना जितके क्रिकेट समजले, उमजले त्याच्या कणभरही ते प्रत्यक्ष मैदानावर खेळलेल्या अभागींना आकळले नव्हते हा सर्वच चर्चाचा मथितार्थ. या पिढ्यांमध्ये संजीव गोएंका जन्माला आले हा त्यांचा दोष नाही. त्यातून ते ठरले मालक. तेदेखील साधेसुधे नव्हे, तर अवघ्या क्रिकेट जगतासाठी क्रांतिकारी ठरलेल्या इंडियन प्रीमियर लीग या जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट लीगमधील एका फ्रँचायझीचे मालक. या लीगला अधिष्ठान आहे, क्रिकेट जगतातील सर्वशक्तिमान क्रिकेट मंडळ म्हणजे अर्थात बीसीसीआयचे. तशात दिल्लीतील विद्यमान सत्ताधीश आणि क्रिकेटचे सत्ताधीश यांच्यातील सीमारेषा सध्या बरीचशी पुसट आहे. त्यामुळे सत्ता आणि मालकीच्या युतीतून संजीव गोएंकांसारखी फ्रँचायझी मालक मंडळी शिरजोर झाली नसती, तरच नवल.

तर अशा या महाशयांनी नुकत्याच एका सामन्यापश्चात लखनऊचा कर्णधार के. एल. राहुलची सर्वासमक्ष भर मैदानात झाडाझडती घेतली. लखनऊचा संघ सामना दारुण हरला होता आणि त्यामुळे संजीव गोएंका संतप्त झाले असणे स्वाभाविक आहे. तरीदेखील त्यांनी राहुलला अशा प्रकारे बोल लावायला नको होते, याविषयी मतैक्य आहे. त्यातही राहुल निमूटपणे सारे काही ऐकून घेत होता. त्याचाही पारा चढता आणि 'अरे'ला 'का रे' जबाब तो देता, तर कदाचित तो संवाद इतका एकतर्फी झाला नसता. शिवाय समोर राहुलऐवजी विराट कोहली असता, तर अशा प्रकारे त्याला सुनावण्याची हिंमत कुणा मालकाची झाली असती? कदाचित झालीदेखील असती. कारण या संस्कृतीमध्ये खेळाच्या चाव्या मालकांकडे आहेत. ही मालक मंडळी बोली लावून खेळाडू खरीदतात. त्या बोली लावतानाचे हावभाव आणि 'किंमत ठरवताना' दीर्घ कारकीर्द असलेल्यांनाही किरकोळीत कशा प्रकारे काढले जाते, याचे दर्शन दूरचित्रवाहिनीवरून वर्षानुवर्षे घडत आहेच. या संस्कृतीमध्ये सीमारेषेचे पावित्र्य नसते. ही सीमारेषा खेळाडू आणि इतरेजनांदरम्यानची असते. मागे काही जुन्याजाणत्या खेळाडूंनी एका प्रवृत्तीविषयी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. अनेकदा मालक मंडळी किंवा त्यांची पुढची पिढी मैदानात केवळ खेळाडू व प्रशिक्षकांसाठी राखीव असलेल्या विश्रामतंबूत सर्रास बसतात. जुन्याजाणत्यांच्या मते ते गैरच नव्हे, तर मुजोरपणाचेदेखील होते. याचे कारण खेळाडू म्हणजे आपल्या पदरी पैसे मोजून बाळगलेले पगारी नोकर असल्यासारखे या मालक मंडळींना वाटत असावे. त्यामुळे मैदान हे खेळाडूंचेच असते आणि त्याचे पावित्र्य सर्वांनी जपले पाहिजे या जुनाट समजुतीशी त्यांना काही देणेघेणे असण्याचे कारण नाही. आणि त्या लिलावांविषयीदेखील काय बोलावे? आयपीएल ही जगातली सर्वाधिक वेगाने विस्तारणारी क्रीडा लीग असल्याचे दावे येथे केले जातात.



## आजची चित्रोळी

चराचरी तर तूं भरलासे
फक्त ऐकलें होते !
नित्य वापराच्या वस्तूतून
तुला पाहिले नव्हते !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर,**
**विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### तुमची स्वप्ने, माझा संकल्प

पंतप्रधान मोदी म्हणाले, बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांना श्रद्धांजली अर्पित करतो. मी कल्याण भूमीवर आपला आशीर्वाद मागायला आलो आहे. पहिल्यांदा प्रत्येक घरात पाणी येताना बघत आहे. देश पहिल्यांदा 25 कोटी भाऊ-बहिणींना गरिबीतून बाहेर पडत असल्याचे बघत आहोत. पहिल्यांदा गरिबांजवळ आजारपणात मोफत उपचारासाठी गॅरंटी कार्ड आहे. गरिबांना पाहिले प्राधान्य दिले आहे. गरिबांसाठी घरे बांधण्याचं काम सुरु आहे, असंही मोदींनी म्हटलं आहे.

4 जूननंतर पण अशीच मेहनत करणार

भारतात आपण नवीन आत्मविश्वास बघत आहोत. सरकार बनल्यानंतर पहिल्या 100 दिवसात काय काम करणार यासाठी नियोजन केलं आहे, असं मोदींनी सांगितलं आहे. आज जेवढी मेहनत करतो तेवढीच मेहनत, 4 जूननंतर पण सुरू राहणार आहे. सरकारचं ब्ल्यू प्रिंट रेडी आहे. मी काशीमध्ये होतो. त्यावेळी मी पाहिलं देशातील तरुणाकडे नवीन कल्पना आहेत. प्रत्येक गोष्ट नावीन्य आहे. यामुळे मी प्रभावित झालो आहे. तुम्ही मला नवीन कल्पना लिहून पाठवा, त्यातील निवडक कल्पनांवर आम्ही काम करू आणि विकास करू, असंही पंतप्रधानांनी यावेळी नमूद केलं आहे.

पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले, तुमची स्वप्ने ही मोदींचा संकल्प आहे. माझा प्रत्येक क्षण आणि तुमच्यासाठी आणि देशासाठी असेल. आज भारत ज्या उंचीवर पोहचला आहे, तिथून पुढे देशाला कोण घेऊन जाऊ शकतो. ज्यांनी गरिबी हटवण्याचा खोटा नारा दिला आणि गरिबीची माला जपली आहे. भ्रष्टाचार केले, असे लोक देशाला पुढे घेऊन जाऊ शकतात का. मागच्या सरकारमध्ये ब्रेक लागला होता. मात्र ब्रेक हटवला आणि फास्ट गाडी घेऊन गेली. प्रत्येकाला विश्वास आहे, फिर एक बार मोदी सरकार काँग्रेस. कधीच विकासाचा विचार करू शकत नाही, असंही मोदींनी म्हटलं आहे.

### उच्च न्यायालयाने नेमलेली खारफुटी...

मंत्रालयाचे अधिकारी टी. के. सिंग यांनी तसा ई-मेलही पाठवला आहे. हे निर्देश ताजे असतानाच आता 'नॅटकनेक्ट'च्या तक्रारीवरून मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार खारफुटी समितीही येत्या २९ मे रोजी डीपीएस तलावाभोवती सिडकोने बांधलेल्या बंधाऱ्याची पाहणी करणार असल्याचे कुमार म्हणाले. याबाबत सागर शक्तीचे प्रमुख नंदकुमार पवार म्हणाले की, खरे तर डीपीएस तलावात येणारा भरतीचा प्रवाह रोखणारा बांधल्याने अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याची वेळ आली आहे. यामुळे कच्च्या रस्त्याने पाण्याच्या प्रवाहासाठी जी व्यवस्था केली आहे ती देखील आता ब्लॉक झाली आहे.

तलाव वाचविण्याची मोहीम झाली तीव्र

'नॅटकनेक्ट'सह नवी मुंबई एन्व्हायर्नमेंटल प्रिझर्व्हेशन सोसायटी, सेव्ह फ्लेमिंगो अँड मँग्रोव्हज, पारसिक ग्रीन्स, खारघर हिल आणि वेटलँड यांनी डीपीएस फ्लेमिंगो तलावात येणारा पाण्याचा प्रवाह वाचवण्याची मोहीम आधीच सुरू केली आहे. कारण अलीकडे येथे १० पेक्षा जास्त फ्लेमिंगो मरण पावले असून अनेक जखमी झाले आहेत. पाण्याचा प्रवाह रोखला गेल्याने तलाव कोरडा पडून फ्लेमिंगोंना त्यांचे अन्न मिळत नसल्याने त्याच्या शोधार्थ इतत्र भरकटून त्यांचा मृत्यू होत असल्याचे पर्यावरणप्रेमींचे म्हणणे आहे.

### आठ दिवसात स्ट्रक्चरल ऑडिटचा...

काय आहे जाहीरात धोरण

ठाणे महानगरपालिकेच्यावतीने २००३ च्या शासन जाहिरात धोरणानुसार जाहिरातफलक उभारणीस परवानगी देण्यात येते. यापुढे जाहिरातफलक लावण्यासाठी परवानगी देताना शहराच्या सौंदर्यास बाधा येणार नाही अशा पद्धतीने परवानगी देणे, किती क्षेत्रफळामध्ये आणि किती आकाराचे होडींग उभा करता येईल, किती अंतरावर परवानगी देता येईल याबरोबरच न्यायालयाच्या निदेर्शांचे पालन करणे, नागरिकांच्या दृष्टीस अडथळा होणार नाही याची दक्षता घेणे असे सर्वसमावेशक धोरण तयार करण्यात आले आहे.

होडींग्ज बाबत पालिका प्रशासनाच्या नियमावलीमध्ये २० फुटापर्यंत होडींग्ज असावे, रस्त्याच्या अथवा फुटपाथच्या कडेला रस्त्यावर होडींग्ज असू नये, कोणते रंग असावेत कोणते असू नयेत, अश्लील मजकुर प्रसिध्द होऊ नये, फुटपाथ पासून चार फुट आतमध्ये होडींग्ज असावे, नागरीकांच्या तक्रारी असल्याने त्या ठिकाणी होडींग्ज उभारण्यात येऊच नये तसेच दोन होडींग्जमध्ये कीती अंतर असावे याची माहिती सुध्दा पालिकेने दिलेली आहे. अशी १८ नियमांची ही नियमावली आहे. आता याच नियमावलीची आठवण जाहीरातदारांना करुन देण्यात आली आहे. आता त्याचे पालन होणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### रेल्वेचा फेरीवाल्यांवर दंडुका!...

विनापरवाना खाद्यपदार्थ, बाटलीबंद पाणी विकणाऱ्या फेरीवाल्यांवर कारवाईचा दंडुका उगारण्यात आला.

या मोहिमेमध्ये २७ एप्रिल ते १२ मे या कालावधीत ५६० फेरीवाल्यांना पकडण्यात आले. त्यातील ३५१ फेरीवाल्यांवर न्यायालयात खटला दाखल करून त्यांच्याकडून तीन लाख १७ हजार ४२५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच फेरीवाल्यांकडून एक हजार ९४५ पाण्याच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. याशिवाय रेल्वेच्या अधिकृत स्टॉलवर खाद्यपदार्थ आणि पाण्याच्या बाटल्यांची जास्त किमतीने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांकडून ६० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

पुणे रेल्वे स्थानक परिसरात अनेक विक्रेते छापील कमाल किमतीऐवजी जास्त पैसे प्रवाशांकडून उकळत आहेत. त्याचबरोबर अनधिकृत कंपन्यांच्या उत्पादनांची विक्री केली जात असल्याच्या तक्रारी अनेक प्रवाशांनी केल्या आहेत. पाण्याच्या बाटलीची विक्रीही जादा दराने केली जात असल्याचे अनेक प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे. त्यामुळे प्रवाशांची लूट करणारे विक्रेते आणि फेरीवाले यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

### जोगन्नाचा मृत्यू नक्षलवाद्यांच्या जिव्हारी...

मूळचा तेलंगणातील जयराम (जि. पेदापल्ली) येथे जोगन्नाचा जन्म झाला. बालवयात त्याचे वडील गेले, आईने दोन बहिणींची लग्ने केली. अस्पृश्यता, जातीवादाचे चटके सोसत जोगन्ना लहानाचा मोठा झाला. भर तारुण्यात शेतकऱ्यांच्या न्याय-हक्काची भाषा करू लागला, पण या आंदोलनात शेतकरी नेत्याची हत्या झाली आणि सुडाने पेटलेल्या जोगन्नाने अत्याचार करणाऱ्या जमीनदाराची हत्या केली. सहा महिन्यांनी जामिनावर सुटल्यावर तो नक्षलचळवळीत सामील झाला. सुरुवातीला नरसय्या नावाने तो परिचित होता, पण नक्षलचळवळीत त्याला जोगन्ना हे नाव देण्यात आले, असे पत्रकात नमूद आहे.

मृत्यूसमयी जोगन्ना ६६ वर्षांचा होता. ३३ वर्षांत नक्षलचळवळीत सदस्य ते नेता असा प्रवास त्याने केला. एटापल्लीतून त्याने सदस्य म्हणून नक्षलचळवळीसाठी काम सुरु केले. गुरिल्ला दल उपकमांडर, कमांडर, विभागीय समिती अध्यक्ष, क्षेत्रीय कमेटी (रिजनल) सदस्य, संघटन व सैनिक मोर्चाचे नेतृत्वही त्याने केले. क्रांतिकारी जन कमेटीच्या एरियाअध्यक्षपदाची जबाबदारीही त्याने सांभाळली. एटापल्ली, धानोरा, अहेरी, चामोर्शी व कोरची या तालुक्यांत त्याचा अधिक वावर राहिला.

### अनधिकृत फलक हटवण्यास सुरुवात

मात्र रेल्वेच्या हद्दीतील जाहिरात फलक अवाढव्य आकाराचे आहेत. तसेच मुंबई महापालिकेची परवानगी न घेताच हे फलक उभारण्यात आले आहेत. त्यामुळे पालिका प्रशासनाने घाटकोपर दुर्घटनेनंतर या नोटीसा पाठवल्या आहेत.

घाटकोपरमधील छेडानगर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनास्थळाची महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी बुधवारी पाहणी केली. घटनास्थळावरील परिस्थितीचा आढावा घेऊन मुंबईतील अनधिकृत जाहिरात फलकांवर निष्कासन कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले होते. दरम्यान, दुर्घटनास्थळी महानगरपालिकेची परवानगी न घेता उभारण्यात आलेल्या अन्य तीन जाहिरात फलकांवर युद्धपातळीवर निष्कासन कारवाई सुरू आहे. तीनपैकी दोन जाहिरात फलक बुधवारी रात्रीपर्यंत, तर एक जाहिरात फलक गुरुवारी १६ मे रोजी काढण्यात येईल, असे महानगरपालिका अधिकाऱ्यांनी सांगितले. वाऱ्याचा वेग, वाहतूक व्यवस्थापन, उपलब्ध मनुष्यबळ यांची सांगड घालून ही कारवाई युद्ध पातळीवर सुरू आहे. दुर्घटनास्थळी सुरू असलेल्या मदतकार्यात अडथळा न आणता या तीन फलकांच्या निष्कासन कारवाईला वेग दिला जात आहे. जाहिरात फलकांच्या लोखंडी सांगाड्याचे सुटे भाग करण्याचे आणि ते खाली उतरविण्याचे काम अविरत सुरू आहे.

वांद्रे स्थानकातील अवाढव्य फलकालाही नोटीस

पालिकेच्या एच पूर्व विभागाने पश्चिम रेल्वेला नोटीस पाठवून वांद्रे स्थानक परिसरातील सर्व जाहिरात फलकांचे स्थैर्यता प्रमाणपत्र मागितले आहे. वांद्रे स्थानक परिसरात पूर्व बाजूला एक भला मोठा फलक असून त्याची लांबी, रुंदी १२० फूट आहे. लोकल गाडीतून हा फलक स्पष्ट दिसतो. या फलकासाठी ही नोटीस बजावण्यात आली आहे.

### लग्न बीडमध्ये, बिंग फुटले रत्नागिरीत...

याप्रकरणी शहर पोलिस स्थानकातून झिरो नंबरने बीड येथील पोलिस स्थानकात जोडप्याच्या पालकांविरोधात 'पोक्सो' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी १८ वर्षे पूर्ण होऊन ५ दिवस झालेल्या विवाहित तरुणीने झोपेच्या गोळया घेतल्या. त्यानंतर तिला अस्वस्थ वाटू लागल्याने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिल्हा रुग्णालयातील पोलिस चौकीत कर्तव्य बजावत असलेल्या पोलिस कर्मचाऱ्याने त्या मुलीची आणि तिच्या पतीची चौकशी केली. त्यावेळी तो तरुण २७ वर्षांचा आणि ती तरुणी ५ दिवसांपूर्वीच १८ वर्षे पूर्ण झालेली असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले.

तसेच ही तरुणी त्या तरुणाच्या नात्यातीलच असून, त्यांच्यातील प्रेमसंबंधामुळे त्यांच्या नातेवाइकांनी या दोघांचे काही महिन्यांपूर्वी बीड येथे लग्न लावून दिले होते. त्यानंतर नोकरीनिमित्त हे विवाहित जोडपे रत्नागिरीत आले होते. या दोघांमध्ये काही कारणातून वाद झाल्याने त्या तरुणीने झोपेच्या गोळया खाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. दरम्यान, बीड येथे अल्पवयीन मुलीशी लग्न करून लपविलेला गुन्हा अखेर या आत्महत्येचा प्रयत्न केल्याच्या घटनेमुळे पोलिसांच्या निदर्शनास आला. त्यानंतर पोलिसांनी जोडप्याच्या विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

### व्हेरिफिकेशन अभावी अडकले ५ हजार पासपोर्ट

५ हजार अर्जदारांचे नॉर्मल पासपोर्ट अडकून पडले आहेत. सर्वात मोठी तांत्रिक अडचण पोलिस व्हेरिफिकेशनमध्ये येत आहे. कारण पासपोर्ट ऑफिसकडून पाठविण्यात आलेली माहितीच पोलिसांना मिळत नाही.

पासपोर्ट ऑफिसमध्ये डॉक्युमेंट व्हेरिफिकेशननंतर पोलिस व्हेरिफिकेशनसाठी रिक्वेस्ट जाते, ती पोलिसांना त्यांच्या एमपोलिस ॲपमध्ये दिसतच नाही. पोलिसांकडून पडताळणी अहवाल मिळाल्यानंतरच पासपोर्ट मंजूर होऊन प्रिंटसाठी जातो. मात्र, १ एप्रिलपासून नवीन सॉफ्टवेअर कार्यान्वित झाल्यानंतर पोलिसांना त्यांच्या ॲपवर डाटा मिळत नसल्याने पोलिस व्हेरिफिकेशन अडून पडले आहेत. परिणामी, पासपोर्ट बनणे बंद आहे. मात्र, तत्काळ पासपोर्ट बनणे सुरू आहे. कारण यात पासपोर्ट बनविल्यानंतर व्हेरिफिकेशन केले जाते. मात्र, त्याचा कोटा नॉर्मलच्या तुलनेत खूप कमी आहे.

### ...तर दामोदर हॉलसाठी उपोषणाला...


स्थगिती असतानाही सोशल सर्व्हिस लीगने पुन्हा पाडकाम सुरू केल्याचा आरोप करत सहकारी मनोरंजन मंडळाने मराठी रंगभूमीची शिखर संस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेकडे दाद मागितली. यावर नाट्य परिषदेने पत्रकार परिषदेचे बोलावत आपले म्हणणे मांडले. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामलेंसह बाल रंगभूमीच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, बाल रंगभूमीचे कार्याध्यक्ष राजू तुलालवार, परिषदेचे प्रवक्ते अजित भुरे, सहकारी मनोरंजन मंडळाचे अध्यक्ष प्रमोद तांबे, मंडळाचे सचिव के. राघवकुमार, ज्येष्ठ अभिनेते उपेंद्र दाते, निर्माते दिलीप जाधव, अभिनेत्री-लावणी नृत्यांगना मेघा घाडगे, सहकारी मनोरंजन मंडळाचे पदाधिकारी आदी मंडळी उपस्थित होती.

प्रशांत दामले म्हणाले की, दामोदर हॉलच्या बाबतीत ज्या गोष्टी सामोपचाराने व्हाव्या असे वाटत होते त्या झाल्या नसल्याने ही पत्रकार परिषद घ्यावी लागली. मूळात दामोदर हॉल हे नाट्यगृह पुन्हा उभे राहील की नाही? याबाबतच साशंक असल्याने नाट्य परिषदेचे विश्वस्त मंत्री उदय सामंत यांना आमची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेट घालून देण्याची विनंती केली आहे. आचारसंहिता संपल्यानंतर त्यांची भेट घेणार आहोत. मुख्यमंत्र्यांनी एकदाच चर्चा करून हा विषय संपवावा. दामोदर हॉलमधील कर्मचाऱ्यांना संस्थेच्या इतर कामांमध्ये सामावून घेणे गरजेचे आहे. यासाठी सोशल सर्व्हिस लीग, दामोदर हॉलचे व्यवस्थापन, सहकारी मनोरंजन मंडळ आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची एकत्र बैठक घेण्यात यावी. त्यातूनही तोडगा निघाला नाही तर मी सर्व कलाकारांना घेऊन उपोषणाला बसेन असा शब्द नाट्य परिषदेतर्फे देत असल्याचे म्हणत दामले यांनी सरकारला थेट ईशारा दिला आहे.

यासाठी दामलेंनी सरकारला २८ मेपर्यंतची वेळ दिली आहे. त्यानंतर रंगकर्मीतर्फे उपोषणाचे हत्यार उपसले जाईल. नीलम शिर्के-सामंत यांनी दामलेंच्या वक्तव्याला दुजोरा देत अगोदर शाळा बांधून झाल्यास दामोदर हॉल पुन्हा उभा राहिल याची खात्री वाटत नसल्याचे म्हटले. दामोदर हॉलच्या या लढ्यात लोककलावंतही सामील होतील अशी ग्वाही मेघा घाडगेने दिली.

# लोककवी वामनदादा कर्डक

महाराष्ट्राचे लोककवी, शाहीर, आंबेडकरी चळवळीचे बुलंद कार्यकर्ते आणि समाज प्रबोधनकार वामन तबाजी कर्डक यांची काल म्हणजे १५ मे रोजी २० वी पुण्यतिथी होती. त्यांच्या २० व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारा हा विशेष लेख. वामनदादा कर्डक यांचा जन्म १५ ऑगस्ट १९२२ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर तालुक्यातील देशपंडी या छोट्याशा खेड्यात एका गरीब कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव तबाजी तर आईचे नाव सईबाई असे होते. त्यांना एक मोठा भाऊ आणि एक धाकटी बहीण होती. वामनदादा यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना शिक्षण घेता आले नाही. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने उदरनिर्वाहासाठी दादा मिळेल ती कामे करू लागले. जत्रा यात्रांमधून कुस्ती खेळू लागले त्यातून जे पैसे मिळत त्यातून ते घरखर्च चालवू लागले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले पण त्यांना कौटुंबिक स्वास्थ्य लाभले नाही. त्यांच्या पत्नीचे अकाली निधन झाले पुढे मुलाचेही निधन झाले. इतके मोठे दुःख उराशी बाळगून त्यांनी मुंबई गाठली. मुंबईत त्यांनी गिरणी कामगार म्हणून काम केले. बीडीडी चाळीत त्यांचे वास्तव्य असे तिथेच त्यांची सैनिक समता दल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांशी ओळख झाली. समता सैनिक दलातर्फे डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या सभेचे आयोजन करण्यात त्यांचा पुढाकार असायचा. वामनदादांना लहानपणापासून गायनाची आवड होती. त्यांना मिळालेली प्रतिभा ही जन्मदत्त देणगी होती. लहानपणापासून गायनाची आवड असलेल्या वामनदादांकडे लेखणी, वाणी आणि संगीत यांचा त्रिवेणी संगम होता. एक दिवस फावल्या वेळेत ते राणीच्या बागेत बसले असताना त्यांनी एका हिंदी



चित्रपट गीताचे विडंबन केले. ते गीत त्यांनी राणीच्या बागेतील गर्दीपुढे म्हटले. त्यांचे हे विडंबन गीत उपस्थित लोकांना खूप आवडले. त्यांचा आवाज आणि गाण्याचे बोल लोकांना आवडू लागले. पुढे ते आंबेडकरी जलशांमध्ये गाऊ लागले. विशेषतः ज्या ठिकाणी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण असे त्याठिकाणी बाबासाहेबांच्या भाषणाआधी वामनदादांचे गाणे होत असे. बाबासाहेबांनी त्यांच्या गाण्याची स्तुती अनेकवेळा आपल्या भाषणांमधून केली आहे. बाबासाहेब म्हणत माझ्या दहा भाषणांचं काम शाहिरांचं एक गाणे करते. वामनदादांचे बहुतांश गीते हे लोकगीते आहेत. वामनदादांची गीते म्हणजे कोंडलेल्या मनाचा हुंकार. वामन दादांच्या गीतांचा केंद्रबिंदू हा मानव होता म्हणूनच वामनदादा म्हणतात मानवा इथे मी तुझे गीत गावे.... तुझे गीत व्हावे मानवता. आंबेडकर भक्ती, दलित, शोषित, स्त्रीमुक्ती, जातीव्यवस्था यावर वामन दादांनी आपल्या गीतातून प्रबोधन केले. दादांनी आपल्या गीतातून हुंडाबळी, ऊसतोड कामगार, पर्यावरण, कामगार, शेतकऱ्यांचे प्रश्न, दुष्काळ यावरही भाष्य केले. त्यांच्या गीतांचे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर हेच होते. वामन दादांनी स्वतःला भीमकार्यात वाहून घेतले. दादांनी आपल्या असंख्य लोकगीतांतून लोकांना भुरळ घातली. म्हणूनच ते लोककवी झाले. दादांनी आयुष्यभर आंबेडकरी विचारांची पताका आपल्या खांद्यावर खंबीरपणे वाहिली. आपल्या तेजस्वी लेखणीने आणि कणखर वाणीने फुले, शाहू, आंबेडकर घराघरांत पोहचवणाऱ्या या महाकवीचे १५ मे २००४ रोजी निधन झाले. लोककवी वामन दादा कर्डक यांना २० व्या पुण्यतिथीनमित्त विनम्र अभिवादन!

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कल्याण-डोंबिवली पालिका हद्दीत २०० हून अधिक बेकायदा फलक



● कल्याण : कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत २०० हून अधिक बेकायदा जाहिरात फलक लावण्यात आले आहेत. या फलकांना कल्याण डोंबिवली पालिकेच्या परवानग्या नाहीत. बहुतांशी बेकायदा फलक माजी नगरसेवकांच्या आशीर्वादाने लावण्यात येत आहेत. या बेकायदा फलकांवर स्वताचा ताबा ठेऊन काही राजकीय मंडळी या माध्यमातून पालिकेला अंधारात ठेऊन व्यवसाय करत असल्याची माहिती काही नोंदणीकृत जाहिरात कंपन्यांच्या मालक, अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली.

घाटकोपर येथे फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेत अनेक निष्पापांचे जीव गेले आहेत. या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली पालिका प्रशासन आता जागे झाले आहे. कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील कल्याण पूर्व, शिळफाटा रस्ता आणि काटई भागात सर्वाधिक बेकायदा फलक लावले जात आहेत. हे सर्व फलक काही माजी नगरसेवक, राजकीय मंडळींच्या आशीर्वादाने लावले जातात. अशाप्रकारे फलकासाठी जागा अडवून तेथे मोबदला घेऊन इतरांना जाहिराती लावण्यास मुभा द्यायची असे प्रकार कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे नोंदणीकृत जाहिरातदार कंपन्यांच्या मालक, अधिकाऱ्यांनी सांगितले.

### फलक तपासणी आदेश

घाटकोपर मधील फलक दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवली पालिकेच्या मालमत्ता विभागाने पालिका हद्दीतील धोकादायक, अतिधोकादायक फलकांची पाहणी करून अशा धोकादायक फलकांवर मालमत्ता विभागाच्या माध्यमातून कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती मालमत्ता विभागाचे उपायुक्त धर्येशील जाधव यांनी दिली. मालमत्ता विभागाकडून १८२ जाहिरात फलकांना परवानगी देण्यात आली आहे. अशा फलकांमुळे पावसाळयात कोणताही धोका नको म्हणून अशा सर्व फलकांची जाहिरातदार कंपन्यांच्या मालकांनी संरचनात्मक तपासणी करून तो अहवाल मालमत्ता विभागाकडे दाखल करावा. परवानगी व्यतिरिक्त असलेल्या फलकांवर कारवाई करण्याचे आदेश प्रभाग साहाय्यक आयुक्तांना देण्यात आले आहेत, असे उपायुक्त जाधव यांनी सांगितले.

पालिका हद्दीत मालमत्ता विभागाच्या परवानगी शिवाय लावण्यात आलेल्या फलकांवर कारवाई केली जाणार आहे. अधिकृत फलक लावणाऱ्या कंपन्यांना संरचनात्मक अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. -धर्येशील जाधव, उपायुक्त, मालमत्ता विभाग.

कल्याण, डोंबिवलीत राजकीय वजनदार मंडळी ज्या भागात अधिक आहेत. तेथे बेकायदा फलकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्या फलकांवर वर्षभर याच मंडळींचे, त्यांचे समर्थक यांचे वाढदिवस, इतर उपक्रमांचे कार्यक्रम, प्रतिमा सतत झळकवल्या जातात, असे सुत्राने सांगितले. पालिका अधिकाऱ्यांनी अशा बेकायदा फलकांवर कारवाई केली तर त्यांना राजकीय मंडळी दबाव आणून ती कारवाई थांबविण्यास भाग पाडतात. या माहितीला काही पालिका अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला.

**पालिकेचे नुकसान**

काही जाहिरात कंपन्या कल्याण डोंबिवली पालिकेकडून रस्त्यांवर फलक लावण्यासाठी दर भरणा करून जागा निश्चित करतात. फलकाच्या एका बाजुला लावण्यात येणाऱ्या फलकाचा दर कंपन्यांनी पालिकेकडे भरणा केलेला असतो, पण काही जाहिरातदार फलकाच्या दुसऱ्या बाजुला पालिकेला अंधारात ठेऊन जाहिराती लावून स्वताचा आर्थिक फायदा करतात आणि पालिकेचे आर्थिक नुकसान करत असल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिली.

## थोडक्यात

### पनवेल महापालिकेच्या पहिल्या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे काम ८० टक्के पूर्ण



● पनवेल : पनवेल महापालिकेच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच पालिका नवीन पनवेल येथे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र उभारत असून या क्रिकेट प्रशिक्षण केंद्राचे ८० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून जून अखेरीस हे बांधकाम पूर्ण होणार आहे. नुकतेच पालिका आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी प्रशिक्षण केंद्राची पाहणी करुन कामाचा आढावा घेतला.

पनवेल महापालिकेच्या सदस्यांनी सभागृहात ठराव करुन सिडको महामंडळाकडून क्रिकेट प्रशिक्षणासाठी नवीन पनवेल येथील आदई सर्कलशेजारचा २८ हजार चौरस मीटरचा भव्य भूखंड मिळविला. या भव्य भूखंडावर क्रीडांगणाचे आरक्षण असल्याने पालिकेने येथे क्रिकेट प्रशिक्षणासाठी भव्य मैदान बांधले आहे. तब्बल १२ कोटी रुपये पालिका या प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामासाठी खर्च करत आहे. पुढील नऊ वर्षे देशाचे ज्येष्ठ क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांच्या प्रशिक्षण संस्थेला हे प्रशिक्षण केंद्र पालिका देखभाल व प्रशिक्षणासाठी देण्याचे पालिका सदस्यांनी ठरविले आहे.

वेंगसरकर यांची प्रशिक्षण संस्था वर्षात शंभर प्रशिणार्थींना या मैदानात क्रिकेटचे धडे देणार आहे. शंभर प्रशिक्षणार्थी निवडताना पनवेल पालिका क्षेत्रातील ५० तसेच रायगड जिल्ह्यातील २५ व राज्यातील २५ या निकषावर प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली जाणार आहे. जुलै महिन्यात दिलीप वेंगसरकर प्रशिक्षण संस्थेकडे हे मैदान हस्तांतरण झाल्यानंतर यंदाच्या दिवाळीपासून या मैदानातून क्रिकेटच्या प्रशिक्षणाला सुरुवात होईल अशी अपेक्षा आहे. वेंगसरकर यांची संस्था या मैदानाच्या देखभालीचा खर्च विविध कंपन्यांच्या कोर्पोरेट सोशीअल रिस्पॉन्सिब्लिटी (सीएसआर) निधीतून करणार आहे. तसेच या मैदानामध्ये विविध क्रिकेट सामन्यांच्या मालिका आयोजित करुन त्यामधून मिळणाऱ्या नफ्यातून या प्रशिक्षण केंद्राची देखभाल वेंगसरकर यांच्या संस्थेला करावी लागणार आहे.

### मोदींच्या सभेसाठी व्यासपीठावर स्थान नाही, कल्याणमधील शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांचा राजीनामा



कल्याण : कल्याण मधील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बुधवारच्या सभेसाठी व्यासपीठावर स्थान न मिळाल्याने नाराज झालेले शिवसेनेचे शिंदे गटाचे कल्याण-मुरबाड जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी आपल्या पदाचा बुधवारी तडकाफडकी राजीनामा दिला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी राजीनामा पाठविला आहे. सुरुवातीला ठाकरे गटाकडे असलेले मोरे शिंदे गटात यापूर्वीच दाखल झाले होते. मराठा आरक्षण आंदोलना दरम्यान त्यांनी महत्वाची भूमिका बजावली होती. अलीकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण, डोंबिवलीतील प्रत्येक कार्यक्रमात ते आघाडीवर होते. त्यामुळे ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मोरे यांनी राजीनामा दिल्याने शिंदे गटात खळबळ उडाली आहे.कल्याण-मुरबाडचे आपण शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आहोत. यजमान जिल्हाप्रमुख म्हणून आपणास मोदींच्या सभेच्या व्यासपीठावर स्थान पाहिजे होते. शिवसेनेच्या पक्षांतर्गत धोरणाप्रमाणे अनेक पदाधिकारी आपल्या अंतर्गत काम करत असतात. पक्ष पदाधिकाऱ्यांची एवढी मोठी फळी आपल्या अधिकारांतर्गत काम करत असताना आपणास मोदी यांच्या सभेसाठी व्यासपीठावर डावलणे योग्य नाही, अशी नाराजी अरविंद मोरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे राजीनामा पत्रातून व्यक्त केली आहे. यजमान जिल्हाप्रमुख म्हणून आपणास डावलण्यात आल्याने आपण शिंदे गटाचा कल्याण-मुरबाड जिल्हाप्रमुख पदाचा राजीनामा देत आहोत.

## दुसरी तुळई सांधण्याचा टप्पा पूर्ण, सागरी किनारा मार्ग आणि वांद्रे वरळी सागरी सेतू जोडण्याच्या कामाला वेग येणार



मुंबई : मुंबई सागरी किनारा मार्ग आणि वांद्रे वरळी सागरी सेतूला जोडणारी दुसरी तुळई बुधवारी पहाटे स्थापन करण्यात महानगरपालिकेला यश आले आहे. पहाटे ३ वाजल्यापासून सुरू झालेली ही मोहीम पहाटे ६ वाजून ७ मिनिटांनी पूर्ण झाली. या मोहिमेनंतर सागरी किनारा मार्ग आणि वांद्रे वरळी सागरी सेतू परस्परांना जोडण्याच्या कामाला वेग येणार आहे.

महानगरपालिकेने सागरी किनारा मार्ग आणि वांद्रे वरळी सागरी सेतू परस्परांना जोडणारी बहुप्रतिक्षित पहिली तुळई जोडण्याचा आव्हानात्मक टप्पा २६ एप्रिल रोजी पहाटे पार केला. त्यानंतर, मुंबईकरांना दुसऱ्या तुळईच्या जोडणीची प्रतीक्षा लागली होती. पहिल्या तुळईला लागूनच काही अंतरावर दुसरी तुळई सांधण्यात येणार असल्याने हे काम प्रचंड आव्हानात्मक होते. अखेर महानगरपालिकेने भरती – ओहोटीचा अंदाज घेऊन बुधवारी पहाटे दुसरीही तुळई यशस्वीरीत्या सांधण्याची मोहीम फत्ते केली. पहिल्या तुळईपासून केवळ २.८ मीटर अंतरावर दुसरी तुळई बसविण्यात आली आहे. दुसरी तुळई नरिमन पॉईंटकडून वरळीकडे जाणाऱ्या मार्गावर स्थापन करण्यात आली. तुळईच्या स्थापनेदरम्यान वरळी येथील क्लिव्हलँड जेट्टीमधून मच्छीमारांच्या नौकानयन मार्गात व्यत्यय येणार नाही, याचीही खबरदारी घेण्यात आली आहे. तसेच, पुलाला समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून व दमट वातावरणापासून सुरक्षित ठेवण्यासाठी सी-५ गुणवत्तेचे गंजविरोधक रंगकाम करण्यात आले आहे. या तुळईचे वजन अडीच हजार मेट्रीक टन असून लांबी १४३ मीटर आहे. तसेच, ३१.७ मीटर रुंद आणि ३१ मीटर उंच असे या तुळईचे आकारमान आहे. महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पाडण्यात आली.

## पनवेल पालिका सतर्क, व्हीजेटीआयकडून स्ट्रक्चरल ऑडीट करून अहवाल देण्याबाबत पालिकेची नोटीस



पनवेल : मुंबईतील घाटकोपर येथील सोमवारी घडलेल्या फलक कोसळल्याच्या दुर्घटनेनंतर पनवेल महापालिका सतर्क झाली असून पालिका प्रशासकांनी मंगळवारी सकाळपासून पालिका क्षेत्रातील ८७ विविध फलक उभारलेल्या कंपनीच्या चालकांना नोटीस बजावली आहे. या नोटिशीमध्ये सर्वच फलक उभारलेल्या कंपन्यांनी सात दिवसांच्या आत व्हीजेटीआयकडून या फलकाच्या मनोऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन त्याचा अहवाल पालिकेकडे सुपुर्द करावा असे म्हटले आहे. त्यामुळे मुंबईच्या दुर्घटनेमुळे पनवेलमध्ये फलकाच्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्यांची सुरक्षेचा अहवाल जमा करण्यासाठी धावपळ उडाली आहे.

तीन वर्षांपूर्वी १७ मे २०२१ ला पनवेल शहरामधील एसटी स्टॅण्डलगत असलेल्या आयटीआय येथील इंदीरानगर झोपडपट्टीतील काही झोपड्यांवर फलक कोसळला होता. सुदैवाने या अपघातामध्ये कोणतीही जीवितहाणी झाली नाही. पालिकेने त्यानंतर फलक उभारणाऱ्या कंपनी चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पनवेल महापालिकेच्या सभागृहाचा कारभार लोकप्रतिनिधींच्या हाती असताना पालिका सदस्यांनी पालिकेच्या फलक धोरणाला मंजुरी दिली होती.

## ठाणे जिल्ह्यात प्रथमच कर्करोग माहिती केंद्र, केंद्रावर रुग्णांना मोफत मार्गदर्शन



ठाणे : कर्करोग संदर्भातील माहिती कर्क रुग्णांना एका ठिकाणी उपलब्ध व्हावी त्यासह, रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकाच्या मनात विश्वास, उमेद निर्माण होण्यासाठी ठाणे जिल्ह्यात प्रथमच कर्करोग माहिती केंद्र उभारण्यात आले आहे. ठाण्यातील तीनहात नाका येथे हे केंद्र सुरु असून शहरातील आधाररेखा प्रतिष्ठानच्या माध्यमातून याठिकाणी रुग्णांना तसेच त्यांच्या नातेवाईकांना मोफत मार्गदर्शन केले जाते. ठाणे शहरातील आधाररेखा प्रतिष्ठान गेले ११ वर्षे कर्करुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांचे समुपदेशन, तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यरत आहे.

ठाण्यात राहणाऱ्या रश्मी जोशी याचे पती अरविंद जोशी हे कर्करोगग्रस्त होते. त्यामुळे कर्करुग्ण आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या अडचणी, वेदना त्यांनी जवळून अनुभवल्या आहेत. हा त्रास इतर रुग्णांना आणि त्याच्या नातेवाईकांना होऊ नये यासाठी या पती-पत्नीने मे २०१३ मध्ये 'आधाररेखा प्रतिष्ठान'ची स्थापना केली. कर्करुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी विविध योजना आखून विनामूल्य सहकार्य करण्याचे त्यांनी ठरविले. त्यानुसार, संस्थेच्या माध्यमातून सुरुवातीला आरोग्याविषयीची माहिती देण्यासाठी मोफत आरोग्यजत्रा उपक्रम, वैद्यकीय, आहारशास्त्र, मानसशास्त्र आणि योगाभ्यास या विषयावर तज्ज्ञ वक्त्यांची 'आधार माला' या नावाने संवाद मालिका राबविण्यात आली. हे समाजकार्य करत असताना २०१७ मध्ये अरविंद जोशी याचे निधन झाले, परंतु, अरविंद यांच्या पत्नी रश्मी यांनी हे समाजकार्य पुढे कायमस्वरुपी सुरु ठेवले. रश्मी यांच्यासोबत २० ते २५ स्वयंसेवक या कार्यात जोडले आहेत. त्यांच्या या कार्याला रुग्णांचा आणि त्यांच्या नातेवाईकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो. ठाणे शहरासह मुंबई उपनगरातूनही त्यांना मार्गदर्शनासाठी संपर्क साधला जात. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांचे समोरा समोर बसून समुपदेशन आणि मार्गदर्शन करता यावे, विविध उपक्रम राबविता यावेत यासाठी कर्करोग माहिती केंद्र उभारण्यासाठी हक्काची जागा मिळावी याकरता त्यांचे प्रयत्न सुरु होते. अखेर इनरव्हील चॅरिटी ट्रस्टच्या माध्यमातून त्यांना २६ जानेवारी रोजी तीन हात नाका येथे जागा उपलब्ध झाली. याठिकाणी जिल्ह्यातील पहिले कर्करोग माहिती केंद्र उभारण्यात आले आहे. हे केंद्र मंगळवार आणि गुरुवार सुरु असते. याठिकाणी कर्करोगाच्या विविध चाचण्याबाबत रुग्णांना मार्गदर्शन केले जाते. तसेच कर्करोग असल्याचे समजल्यास रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाना नैराश्य येते, त्यांना या नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी समुपदेशनाचे दालनही या केंद्रात आहे, अशी माहिती संस्थेमार्फत देण्यात आली.

कर्करुग्णांना उपचारासाठी परळ येथील टाटा रुग्णालयात वारंवार जावे लागते. यासाठी त्यांना प्रवासखर्च जास्त होत. रुग्णांचा हा खर्च वाचविण्यासाठी या संस्थेमार्फत 'आधारवाहिनी' उपक्रम सुरु आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेने कल्याण शहर अघोषित बंद



● कल्याण : कल्याण, भिवंडीतील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी कल्याणमध्ये येत आहेत. यानिमित्ताने सुरक्षेच्या कारणास्तव मागील पाच दिवसांपूर्वी केलेल्या कारवाईत कल्याणमधील अनेक व्यावसायिकांचे रस्त्यावरील व्यवसाय पालिकेने जमीनदोस्त केले. सभेसाठी नरेंद्र मोदी येणाऱ्या रस्त्यांवरील दुकाने बंद ठेवण्यात आल्याने व्यापाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. कल्याण शहरात येणारे सर्व मुख्य वर्दळीचे रस्ते अवजड वाहनांसाठी बंद करण्यात आले आहेत. या अघोषित बंदीने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मोदी कल्याण जवळील भिवंडी हद्दीतील बापगाव येथील हेलिपॅडवर बुधवारी उतरणार आहेत. हेलिपॅड ते कल्याण पश्चिमेतील वर्टेक्स मैदान, आधारवाडी सभा स्थळ दरम्यानच्या रस्ता सुस्थितीत, मोकळा असावा म्हणून या रस्त्या दुतर्फा स्थानिक ग्रामस्थ, तरूणांनी काही वर्षांपूर्वी सुरू केलेल्या भाजीपाला विक्री, ढाबे, वडापाव, मिसळ विक्रीचे व्यवसाय सुरू केलेले सर्व व्यवसाय मोदींच्या विशेष सुरक्षा पथकाच्या आदेशावरून कल्याण डोंबिवली पालिकेने जमीनदोस्त केले. या कारवाईमुळे अनेक व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. या रस्त्यालगतीची पक्की दुकाने हिरव्या जाळया लावून बंदिस्त केली आहेत.

डोंबिवली एमआयडीसी, भिवंडीतील सरवली एमआयडीसीत कच्चा आणि पक्का माल घेऊन जाण्यासाठी परराज्यातील अवजड वाहने कल्याण, भिवंडी शहरांच्या वेशीवर मंगळवारपासून थांबली आहेत. त्यांना शहरात प्रवेश नसल्याने उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

कल्याण शहरात येणारे नेवाळी नाका, म्हारळ, शिळफाटा, भिवंडी बाह्यवळण, पडघा-कल्याण रस्ता येथील मुख्य रस्ते अवजड वाहनांसाठी बंद करण्यात आले आहेत. सर्व अवजड मालवाहू वाहने गावांमधील पर्यायी रस्त्याने इच्छित स्थळी जात आहेत. पडघा-गांधारी पूल मार्गे-कल्याण हा भिवंडी, वाडा, शहापूर भागातील नागरिकांचा सर्वाधिक जवळचा आणि वर्दळीचा रस्ता आहे. या रस्त्यावर बापगाव येथे नरेंद्र मोदी यांचे हेलिकॉप्टर उतरण्यासाठी हेलिपॅड तयार करण्यात आले आहे. या हेलिपॅडच्या सुरक्षितेसाठी बुधवारी सकाळी सात वाजल्या पासून पडघा ते कल्याण रस्ता वाहतुकीसाठी पूर्ण बंद केला आहे. त्यामुळे सापे, बापगाव, आमणे परिसरातील नोकरदार, व्यावसायिकांचे सर्वाधिक हाल झाले. ही मंडळी बुधवारी पहाटेच सुरक्षेचा अडथळा नको म्हणून घरातून कामावर निघाली.

- एका सभेसाठी कल्याण परिसरातील नागरिकांना सुरक्षा व्यवस्थेने वेठीस धरल्याने सर्व स्तरातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. हेलिपॅड ते सभास्थळीच्या रस्त्यावर पालिकेने सीसीटीव्ही लावून दिले आहेत. काही ठेकेदारांनी या कामाचे देयक कोण देणार या विषयावरून काम करण्यास माघार घेतली असल्याचे समजते. सभा मंडप ठेकेदाराला सुरक्षा व्यवस्थेने बेजार केल्याची माहिती आहे. मोदींच्या सभा मंडपापासून ५०० मीटर परिसर वाहनांसाठी बंद करण्यात आला आहे. पर्यायी रस्त्यांचा वापर वाढल्याने कल्याणमध्ये जागोजागी वाहन कोंडी, प्रवासी सभेमुळे हैराण आहेत.
- कल्याण, भिवंडी लोकसभा मतदारसंघातून नागरिकांना घेऊन येणाऱ्या सुमारे दोनशे हून अधिक बस, खासगी वाहने एकावेळी कल्याण परिसरात येणार असल्याने अनेक उद्योजक, व्यावसायिक, जाणत्या नागरिकांनी घराबाहेर पडणे थांबवले आहे.

## उरण- पनवेल मार्गावर चार वाहनांचा एकत्रित अपघात



उरण : बुधवारी १०.३० वाजता उरण-पनवेल मार्गावरील रेल्वे स्थानका नजीक एका चारचाकीसह,रिक्षा,आणि दोन दुचाकी आशा चार वाहनांचा एकत्रित अपघात झाला आहे. यामध्ये चार जण जखमी आहेत. या अपघातात दोन दुचाकी,क्रेटा चारचाकी वाहन व रिक्षाचे नुकसान झाले आहे. यातील रिक्षा अपघात होताच पलटी होऊन रस्त्याखाली कोसळली. अपघात नंतर जखमींना नागरिकांनी रुग्णालयात हलविले आहे. अपघात कसा झाला याची माहिती समोर आलेली नाही. या घटनेनंतर पोलीस आणि वाहतूक कर्मचारी घटनास्थळी आले. रेल्वे स्थानका नजीक महिनाभरापूर्वी क्रेटा वाहनाने दुचाकी वरून जाणाऱ्या एका कुटुंबाला चिरडले होते. या अपघातात एका दाम्पत्याला आपला जीव गमवावा लागला तर मुलगी गंभीर जखमी झाली होती. या अपघाता नंतर त्या घटनेची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. हा उरण शहराला जोडणारा मुख्य मार्ग आहे. त्यामुळे कायमस्वरूपी व्यस्त असलेल्या मार्गा पैकी एक आहे. मात्र या मार्गावरील चारचाकी वाहनांसह इतर वाहनांच्या वेगावर मर्यादा ठेण्यासाठी यंत्रणा न राबविल्यास आशा प्रकारच्या अपघातांची संख्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मावळ लोकसभा मतदारसंघात ५४.८७ टक्के मतदान

पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघातील काही विधानसभा क्षेत्रात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस आला होता. यामुळे मतदान केंद्रावरील विजेच्या खोळंब्यामुळे मतदान केंद्रावरील मतदानाची आकडेवारी उशिरा निवडणूक आयोगाकडे आली. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मंगळवारी सकाळी प्रसिद्ध केलेल्या सुधारीत आकडेवारीनुसार मावळ लोकसभा मतदारसंघात ५४.८७ टक्के मतदान झाल्याचे जाहीर केले.

मावळ लोकसभा मतदारसंघात पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड, पिंपरी या सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश असून २५ लाख ८५ हजार १८ मतदार आहेत. यापैकी १४ लाख १८ हजार ४३९ मतदारांनी मतदान केल्याची नोंद निवडणूक आयोगाकडे झाली. पनवेल विधानसभा क्षेत्रात ५०.०५ टक्के मतदान झाल्याची नोंद मंगळवारी सकाळी निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या सुधारीत प्रसिद्धी पत्रकात केली आहे. सोमवारी रात्री पनवेल विधानसभा क्षेत्रात ४९.२१ टक्के मतदान झाल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले होते.

## माधुरी दीक्षितच्या वाढदिवसानिमित्त श्रीराम नेनेंची खास पोस्ट



९० च्या दशकात अधिराज्य गाजवणारी हरहुन्नरी अभिनेत्री म्हणून माधुरी दीक्षितला ओळखलं जातं. 'तेजाब', 'दयावान', 'राम-लखन', 'खलनायक' अशा बऱ्याच चित्रपटांमध्ये तिने दर्जेदार भूमिका निभावल्या आहेत. याशिवाय माधुरी तिच्या उत्तम नृत्यासाठी देखील ओळखली जाते. करिअरच्या शिखरावर असताना १९९९ मध्ये अभिनेत्रीने लग्न करण्याचा निर्णय घेतला.

डॉ. श्रीराम नेने यांच्याशी लग्न झाल्यावर माधुरी काही वर्षे अमेरिकेत स्थायिक झाली होती. त्यानंतर काही वर्षांनी म्हणजेच २०११ मध्ये ती संपूर्ण कुटुंबासह भारतात परतली. आज धकधक गर्ल तिचा ५७ वा वाढदिवस साजरा करत आहे. यानिमित्ताने माधुरीचे पती डॉ. नेने यांनी इन्स्टाग्रामवर खास पोस्ट शेअर करत तिला शुभेच्छा दिल्या आहेत. डॉ. नेने पत्नीबद्दल लिहितात, "मनमोहक हास्य, चेहऱ्यावर कायम तेज आणि नृत्याची प्रचंड आवड असणाऱ्या माझ्या आयुष्यातील या महत्त्वाच्या स्त्रीला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा! तुझं आमचं सगळयांच्या जीवनात असणं हे मी शब्दांत व्यक्त करू शकत नाही. खरंच आम्ही सगळे (कुटुंबीय) तुझ्यावर प्रचंड प्रेम करतो. माधुरीच्या पतीने या पोस्टबरोबर एक सुंदर असा व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये त्यांनी दोघांचे रोमँटिक फोटो, माधुरीचे काही जुने फोटो, तिचे मुलांबरोबरचे व सासू-सासऱ्यांबरोबरचे फोटो एकत्र व्हिडीओ स्वरुपात शेअर केले आहेत.

# स्टीफन फ्लेमिंग होणार का भारतीय संघाचे प्रशिक्षक



### बीसीसी आयची चाचपणी

बीसीसीआय सध्या पुरूष क्रिकेट संघासाठी नव्या प्रशिक्षकाच्या शोधात आहे, यासाठी बोर्डाने अर्जही मागवले आहेत. पण या दरम्यानचं बीसीसीआय न्यूझीलंड संघाचा माजी खेळाडू आणि आयपीएलमधील सीएसकेचे मुख्य प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांच्या नावाचा विचार करत आहेत. बीसीसीआयच्या अटींप्रमाणे नवे मुख्य प्रशिक्षक हे भारताच्या तिन्ही फॉरमॅटमधील संघाला प्रशिक्षण देतील. त्यामुळे वर्षातून १० महिने संघासोबत राहणे आवश्यक असलेल्या या पदासाठी फ्लेमिंग खरोखरच अर्ज करतात का, हे पाहणे उत्सुकतेचे असेल.

बीसीसीआयने सोमवारी भारतीय पुरुष संघाच्या नवीन मुख्य प्रशिक्षकाच्या नियुक्तीची प्रक्रिया अधिकृतपणे सुरू केली. बोर्डाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, २००९ पासून सीएसकेचे मुख्य प्रशिक्षक असलेले फ्लेमिंग द्रविडच्या जागी योग्य उमेदवार मानले जात आहेत. भारत पुढील काही वर्षांमध्ये सर्वच फॉरमॅटमध्ये संक्रमणाच्या काळातून जाणार आहे आणि यादरम्यान सकारात्मक वातावरण निर्माण करून खेळाडूंकडून सर्वोत्कृष्ट कामगिरी करून घेण्याची क्षमता आणि CSK मधील त्यांचे यश पाहता ते या पदासाठी प्रबळ दावेदार आहेत.

मीडिया रिपोर्ट्स आणि बातम्यांनुसार, आयपीएल दरम्यान अनौपचारिक चर्चा झाली आहे. आत्तापर्यंत, ५१ वर्षीय फ्लेमिंगने चेन्नई व्यवस्थापनाशी फ्रँचायझी सोडण्याच्या कोणत्याही विषयावर चर्चा केलेली नाही, उलट CSK त्यांना प्रशिक्षकपदी कायम ठेवू इच्छित आहे. न्यूझीलंडचे माजी खेळाडू स्टीफन फ्लेमिंग हे एक उत्तम प्रशिक्षक तसेच एक जबरदस्त फलंदाज होते. त्याने किवी संघासाठी १११ कसोटी, २८० एकदिवसीय आणि ५ टी-२० सामनेही खेळले आहेत. त्याने कसोटीत ७१७२ धावा, एकदिवसीय सामन्यात ८०३७ धावा आणि टी-२० मध्ये ११० धावा केल्या आहेत. फ्लेमिंग चेन्नईकडून आयपीएलही खेळला आहे.

## "गेल्या १० वर्षांत आपण...", अटल सेतू पाहिल्यावर काय म्हणाली रश्मिका मंदाना?



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १२ जानेवारी रोजी मुंबईत अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू, या समुद्रावर बांधलेल्या देशातील सर्वात लांब पुलाचं उद्घाटन केलं. मुंबई ते नवी मुंबईला जोडणाऱ्या या पुलामुळे प्रवासादरम्यानचा खूप वेळ वाचतो. हा पूल तयार होण्यापूर्वी मुंबईहून नवी मुंबईला जाण्यासाठी दोन तास लागत होते, तर आता केवळ १५ ते २० मिनिटांत लोक तेथे पोहोचू शकतात. नुकताच दाक्षिणात्य अभिनेत्री रश्मिका मंदानाने या पुलावरून प्रवास केला. 'एएनआय'शी संवाद साधताना तिने या अटल सेतूचं कौतुक केलं आहे. अटल सेतूवरून अभिनेत्रीने पहिल्यांदाच प्रवास केला.

मुंबईचा अशाप्रकारे विकास होऊ शकतो याची कुणी कल्पना देखील केली नसल्याचं यावेळी रश्मिका म्हणाली. अभिनेत्री आपलं मत मांडताना सांगते, "आता आपल्याला सर्वांनाच माहिती आहे की हा दोन तासांचा प्रवास आता केवळ २० मिनिटांत पूर्ण होतोय. या पुलामुळे प्रवास एवढा सोयीचा होईल असा विचार देखील कोणी नसेल. गेल्या काही वर्षात झालेल्या विकासामुळे नवी मुंबई ते मुंबई, गोवा ते मुंबई आणि बंगळुरू ते मुंबई हा प्रवास आता खूपच सोपा झाला आहे. या सुविधा पाहून आपल्या देशाचा अभिमान वाटतो. आता विकासाच्या बाबतीत भारताला कोणीही रोखू शकत नाही. गेल्या १० वर्षांत भारतात खूप विकास झाला आहे. देशात प्रत्येक गोष्टीचं नियोजनही चांगल्याप्रकारे चालू आहे."

## देख रहा है विनोद...", पंचायत वेबसीरीजमध्येही निवडणुकीची लगबग



ग्रामपंचायतीचा सचिव असलेलं अभिषेक त्रिपाठी हे या सीरीजमधील मुख्य पात्र आहे. जितेंद्र कुमार याने आपल्या नैसर्गिक अभिनयाने या पात्राला प्रसिद्ध केलं. याशिवाय महिला सरपंच निना गुप्ता आणि त्यांचे पती रघुबिर यादव यांचा अभिनय, विनोदाची त्यांची उत्तम जाण आणि ग्रामीण बोलीतील संवाद यामुळे तिसऱ्या भागात निवडणुकीची धामधुम चांगलीच रंगलेली दिसत आहे. रघुबीर यादव आपले सरपंच पद टीकवण्याचा तर त्यांचा विरोधक असलेला भूषण (बनराकस) हा त्यांना टक्कर देण्याचा प्रयत्न करणार आहे.

खुशखुशीत गावरान विनोदाची फोडणी असलेली वेबसीरीज म्हणून 'पंचायत'ने स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. पहिल्या भागापासून ही सीरीज लोकांनी उचलून धरली. फुलेरा गावातील ग्रामपंचायत, त्याचा सचिव, सरपंच महिला, तिच्या नावाने कारभार करणारा पती आणि गावातील इरसाल मंडळी यांच्या रोजच्या जीवनातील प्रसंगातून केलेली विनोद निर्मिती हे या सीरीजचे वेगळेपण आहे. आधीच्या दोन्ही सीरीजने प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन केल्यानंतर आता सीरीजचा तिसरा भाग २८ मे रोजी प्रदर्शित होत आहे. देशात लोकसभेच्या निवडणुकीचं वारं वाहत असताना पंचायतमध्येही निवडणुकीची लगबग सुरू असल्याचं ट्रेलरवरून दिसत आहे. टीव्हीएफनं आज तिसऱ्या भागाचा ट्रेलर प्रदर्शित केला. त्यातून निवडणुकीच्या माहौलची चुणूक दिसली.

पंचायत सीरीजच्या दुसऱ्या भागाचा शेवट हसवता हसवता थोडा रडवणारा झाला होता. उपसरपंच असलेल्या पांडे नामक पात्राचा एकुलता एक मुलगा सीमेवर शहीद झाल्याचे दाखविण्यात आले होते. या दुःखातही फुलेरा ग्रामस्त आपला अपमान करणाऱ्या आमदाराला तिथून हाकलून लावत स्वाभिमानाने शहीद सुपुत्रावर अंत्यसंस्कार करतात. याचाच धागा पकडत तिसरा भाग सुरू होत आहे. टीव्हीएफने दोन मिनिटांचा ट्रेलर प्रदर्शित केला असून त्यात तिसऱ्या भागात काय धमाल असणार याची प्रचिती येते.

भूषण हे पात्र दुर्गेश कुमारने रंगवलं आहे. त्याचा "देख रहा है ना विनोद..." हा डायलॉग चांगलाच प्रसिद्ध झाला आहे.

## दिल्लीचा विजय CSK आणि SRH च्या पथ्यावर, प्लेऑफमध्ये जाण्यासाठी करावी लागणार एकच गोष्ट



आयपीएल २०२४ मध्ये आतापर्यंत ६४ सामने खेळवले गेले आहेत. आता साखळी फेरीत फक्त ६ सामने बाकी आहेत आणि दोन संघ प्ले ऑफसाठी पात्र ठरले आहेत. त्याचबरोबर तीन संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले आहेत. हंगामातील ६४व्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने लखनऊ सुपर जायंट्स विरुद्ध विजय मिळवला. या विजयाचा सर्वाधिक फायदा सनरायझर्स हैदराबाद आणि चेन्नई सुपर किंग्जला झाला आहे. हे दोन्ही संघ प्लेऑफमध्ये आपले स्थान निश्चित करण्याच्या अगदी जवळ आले आहेत. प्लेऑफच्या २ जागांसाठी चेन्नई सुपर किंग्ज, सनरायझर्स हैदराबाद, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपरजायंट्स अजूनही प्लेऑफमध्ये पोहोचण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत.

## दिनविशेष

**घटना**

२००७ : निकोलाय सारकॉझी - फ्रान्स देशाचे राष्ट्राध्यक्ष बनले.

२००५ : कुवेत - देशात स्त्रियांना प्रथमच मतदानाचा हक्क प्राप्त झाला.

२०००: बॅडमिंटन - अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी तसेच खेळांचे दूरचित्रवाणी प्रसारण सुलभ करण्यासाठी या खेळातील गेम १५ ऐवजी ७ गुणांचा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१९९६: अटलबिहारी वाजपेयी - भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी सूत्रे हाती घेतली.

१९९३: बचेन्द्री पालच्या नेतृत्वाखालील पहिल्या महिला भारतीय मोहिमेने सात मुलींसह अठरा गिर्यारोहकांना एव्हरेस्ट पादाक्रांत करण्याचा मान मिळवून दिला व नवा जागतिक विक्रम नोंदविला.

१९७५ : जुंको तबेई - माऊंट एव्हरेस्ट सर करणाऱ्या पहिल्या महिला बनल्या.

**जन्म**

१९७०: गॅब्रिएला सॅबातिनी- अर्जेंटिनाच्या टेनिस खेळाडू

१९५० : जॉर्ज बेडनोर्झ - जर्मन भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक नोबेल पारितोषिक

१९४७: वरिंदर सिंग - भारतीय फील्ड हॉकी खेळाडू - ऑलिम्पिक कांस्यपदक, ध्यानचंद खेलरत्न (निधन: २८ जून २०२२)

१९३१: के. नटवर सिंह - भारतीय राजकारणी आणि परराष्ट्रमंत्री

१९२६ : माणिक वर्मा - गायिका ( निधन: १० नोव्हेंबर १९९६)

१९२३ : मेर्टन मिलर - अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक (निधन: ३ जून २००२)

१९०५ : हेन्री फोंडा - अमेरिकन अभिनेते ( निधन : १२ ऑगस्ट १९८२)

**निधन**

२०२२: हुसेन दलवाई - भारतीय राजकारणी, खासदार आणि महाराष्ट्राचे खासदार (जन्म: १६ फेब्रुवारी १९४३) २०२२ : चेतना राज - भारतीय अभिनेत्री

२०१४ : रुसी मोदी - टाटा स्टील कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (जन्म: १७ जानेवारी १९१८) २०१३: हेनरिक रोहरर - स्विस भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक - नोबेल पारितोषिक (जन्म: ६ जून १९३३)

२००८ : रॉबर्ट मोन्डवी - ओपस वन व्हाइनरीचे सहसंस्थापक (जन्म: १८ जून १९१३)

१९९४ : फणी मुजुमदार चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक (जन्म: २८ डिसेंबर १९११) १९९४ : माधव मनोहर - साहित्य समीक्षक

१९९०: जिम हेनसन - द मपेट्सचे जनक (जन्म: २४ सप्टेंबर १९३६)

१९७७ : मादीबो केएटा - माली देशाचे पहिले अध्यक्ष (जन्म: ४ जून १९१५)

## प्रथमेश परब आणि किशोरी शहाणेंचा मजेशीर व्हिडीओ व्हायरल



महाराष्ट्राचा लाडका दगडू अर्थात अभिनेता प्रथमेश परब सोशल मीडियावर खूप सक्रिय असतो. नेहमी आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्याविषयी पोस्ट शेअर करत असतो. काही दिवसांपूर्वीय अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर त्याने चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. आपल्या आगामी चित्रपटाची पोस्ट त्याने शेअर केली. 'मुंबई लोकल' असं प्रथमेशच्या आगामी चित्रपटाचं नाव असून अक्षय्य तृतीतयेला या चित्रपटाचा पोस्टर सिद्धिविनायकाचे आशीर्वाद घेऊन प्रदर्शित करण्यात आला. या चित्रपटात प्रथमेशसह अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर, अभिनेता पृथ्वीक प्रताप, मनमीत पेम झळकणार आहेत. अशातच सध्या प्रथमेशचा ज्येष्ठ अभिनेत्री किशोरी शहाणेंबरोबरचा मजेशीर व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

## "जर मी RCB विरूद्ध खेळलो असतो..." ऋषभ पंतचे सामन्यानंतर मोठे वक्तव्य, BCCI लाही ऐकवलं



ऋषभ पंतच्या नेतृत्त्वाखालील दिल्ली कॅपिटल्सने आयपीएल २०२४च्या साखळी टप्प्यातील सर्व १४ सामने खेळले आहेत. साखळी टप्प्यातील अखेरच्या सामन्यात दिल्लीने अष्टपैलू खेळी करत लखनऊचा १९ धावांनी पराभव केला. या विजयासह दिल्ली १४ गुणांसह प्लेऑफच्या शर्यतीत कायम आहे, पण प्लेऑफमध्ये जाण्याची शक्यता कमी आहे. दिल्लीने आरसीबीविरूद्धचा सामना जिंकला असता तर ते प्लेऑफच्या शर्यतीत नक्कीच एक पाऊल पुढे असते, यावर ऋषभ पंतने साम्यानंतर वक्तव्य केले.

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार ऋषभ पंत असे मानतो की कदाचित त्याच्या एका सामन्याच्या बंदीमुळे दिल्ली कॅपिटल्सला आयपीएल प्लेऑफमध्ये स्थान मिळाले नाही, कारण तो मैदानात असता तर त्यांना रॉयलविरुद्धचा सामना जिंकण्याची मोठी संधी मिळाली असती. या आयपीएल हंगामात तिसऱ्यांदा स्लो ओव्हर रेटसाठी दिल्लीचा संघ दोषी आढळल्याने पंतला १२ मे रोजी रॉयल चॅलेंजर्स बंगलोर (RCB) विरुद्धचा सामना खेळण्यावर बंदी घातली होती.

दिल्ली कॅपिटल्सने केवळ आरसीबीविरुद्धचा सामना गमावला नाही, तर ४७ धावांच्या पराभवामुळे त्यांच्या नेट रन रेटवरही परिणाम झाला. आता प्लेऑफमध्ये पात्र होण्यासाठी दिल्लीला इतर संघांच्या निकालांवर अवलंबून राहावे लागेल. दिल्ली संघ आता १४ गुणांसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. त्यांना सनरायझर्स हैदराबाद (SRH), चेन्नई सुपर किंग्स (CSK) आणि लखनऊ संघाच्या पराभवासाठी त्यांच्या शेवटच्या साखळी सामन्यातील पराभवाची प्रार्थना करावी लागेल. दिल्लीच्या विजयासह राजस्थान रॉयल्स प्ले-ऑफमध्ये पोहोचणारा दुसरा संघ ठरला.

## राशि भविष्य

**मेष**
तुमच्यातील उच्च आत्मविश्वास आज चांगल्या कामासाठी वापरा. धावपळीचा दिवस असला तरी तुमची ऊर्जा टिकून राहील. चंद्राच्या स्थितीमुळे आज तुमचे धन व्यर्थ खर्च होऊ शकते. जर तुम्हाला धन संचय करायचे आहे तर, तुम्ही आपल्या जीवनसाथी किंवा माता-पिता सोबत या बाबतीत बोलू शकतात.

**वृषभ**
आज तुमची प्रकृती चांगली राहील. त्यामुळे तुम्हाला यश मिळेल. परंतु, तुमचे सामर्थ्य संपुष्टात येईल असे काही करण्याचे कटाक्षाने टाळा. आज तुमच्या आई-वडिलांपैकी कुणी धन बचत करण्यासाठी लेक्चर देऊ शकतात तुम्हाला त्यांच्या गोष्टी व्यवस्थित ऐकण्याची आवश्यकता आहे अथवा येणाऱ्या काळात तुम्हाला समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**मिथुन**
अतिखाणे टाळा, तंदुरुस्त राहण्यासाठी हेल्थ क्लबला नियमित जा. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो. कुटुंबाचे सगळे थकलेले कर्ज तुम्ही फेडू शकाल. प्रेमाच्या परमानंदात आज तुमची स्वप्ने आणि वास्तव एकच होतील.

**कर्क**
अनावश्यक घटनांची चर्चा करण्यात वेळ आणि ऊर्जा वाया नका घालवू. एक लक्षात ठेवा वादविवाद चर्चांमधून काहीही हाती लागत नाही, तर काहीतरी हरवतेच. रात्रीच्या वेळी तुम्हाला आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे कारण, तुमच्या द्वारे दिले गेलेले धन आज तुम्हाला परत मिळू शकते.

**सिंह**
आपल्या जीवनसाथी बरोबर चित्रपट पाहणे अथवा रात्रीचे जेवण करणे तुम्हाला शांतता, आराम मिळवून देईल आणि तुमचा मूड एकदम बहारदार राहील. घरातील लहान-लहान गोष्टींवर आज तुमचे खूप धन खर्च होऊ शकते ज्यामुळे तुम्ही मानसिक तणावात येऊ शकतात.

**कन्या**
आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका, विशेषकरून मद्यापान टाळा. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. तुमच्या बेफिकीर वृत्तीमुळे पालक काळजीत पडतील. नवीन प्रकल्पात हात घालण्याअगोदर तुम्हाला त्यांना विश्वासात घेण्याची गरज आहे.

**तूळ**
तुमचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी कठोर प्रयत्न करा. जर तुमची धन संबंधित काही गोष्ट कोर्ट-कचेरीत आटलेली असेल तर आज त्यात तुम्हाला विजय मिळू शकतो आणि तुम्हाला धन लाभ ही होऊ शकतो. तुमचे हसतमुख वागणे कुटुंब जीवन प्रकाशमान करतील.

**वृश्चिक**
अधिक कोलेस्टेरॉल असलेला आहार सेवन करणे टाळा. आज तुम्हाला धन संबंधित काही समस्या असण्याची शक्यता आहे परंतु, तुम्ही तुमच्या कौशल्याने हानीला ही नफ्यामध्ये बदलू शकतात. भावनिक आत्मविशास वाढविण्यासाठी प्रयत्न करणा-यांच्या मदतीला ज्येष्ठ धावून येतील.

**धनु**
आरामात राहण्याचा आनंद आज लुटू शकाल. व्यापारात नफा आज बऱ्याच व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणू शकतो. तुमच्या 'चलता है' भूमिकेमुळे आणि विचित्र वागणुकीमुळे तुमच्यासोबत राहणारी व्यक्ती त्रासून जाईल, अस्वस्थ होईल. आज अचानक प्रणयाराधन करण्याचा योग आहे.

**मकर**
मित्राच्या थंड प्रतिसादामुळे तुम्हाला ठेच लागू शकते, पण चित्त शांत ठेवा. त्यामुळे उध्वस्त न होता आपत्ती टाळून मार्ग कसा काढता येईल याचा विचार करा. काही जणांसाठी प्रवास केल्याने थकून जाल आणि तणाव वाढला तरी आर्थिकदृष्ट्या फायद्यात राहाल.

**कुंभ**
आजच्या दिवशी तुम्ही स्वीकारलेले धर्मादाय काम तुम्हाला मानसिक समाधान आणि आराम मिळवून देईल. व्यापारात मजबुती येण्यासाठी तुम्ही आज काही महत्वाचे पाऊल उचलू शकतात यासाठी तुमचा कुणी जवळचा तुमची आर्थिक मदत करू शकतो.

**मीन**
फूट पाडणारे विचार भावना आणि आवेग नियंत्रणात ठेवा. आपले प्रतिगामी विचार, जुनाट संकल्पना तुमच्या प्रगतीला मारक ठरतील. आपल्या विकासाला धक्का लागेल आणि भविष्यातील वाटचालीत अडथळे निर्माण होतील. आज तुमची काही चल संपत्ती चोरी होऊ शकते म्हणून, जितके शक्य असेल याची काळजी घ्या.

# मावळमधील ‘ईव्हीएम’ कुठे ठेवल्या? कशी आहे सुरक्षा व्यवस्था?




पिंपरी : मावळ लोकसभा मतदारसंघातील मतदान (ईव्हीएम) यंत्रे तसेच टपाली मतपेट्या बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील वेटलिफ्टिंग हॉलमध्ये तयार करण्यात आलेल्या सुरक्षा कक्षात (स्ट्राँगरूम) सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. कडेकोट बंदोबस्त असणारी सुरक्षा कक्ष मंगळवारी (१४ मे) लाखबंद (सील) करण्यात आला.

निवडणूक निरीक्षक बुदिती राजशेखर, निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला, अतिरिक्त पोलीस आयुक्त वसंत परदेशी, सीआरपीएफचे सुभेदार दुर्गेश कुमार मीना तसेच मावळ लोकसभा निवडणुकीतील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ही प्रक्रिया पार पडली. मावळ लोकसभा मतदारसंघासाठी १३ रोजी मतदान प्रक्रिया पार पडली असून ४ जून २०२४ रोजी बालेवाडीत मतमोजणी पार पडणार आहे. मतदानासाठी वापरलेली मतदान यंत्रे सुरक्षित ठेवण्यासाठी बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल येथील वेटलिफ्टिंग हॉलच्या ठिकाणी निवडणूक आयोगाच्या सूचनांची अंमलबजावणी करून सुरक्षा कक्ष तयार करण्यात आला आहे. त्यामध्ये मतदान यंत्रे ठेवण्यात आली आहेत. या कक्षाला केंद्रीय सुरक्षा दलासह महाराष्ट्र पोलीस दलाचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शिवाय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून ‘सीसीटीव्ही’ यंत्रणेसह आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्यात आली आहे.

मतदान प्रक्रिया पार पाडल्यानंतर पनवेल, मावळ, उरण, कर्जत, पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघ निहाय निश्चित केलेल्या ठिकाणी मतदान साहित्य जमा करण्यात आले. त्या ठिकाणाहून कंटेनरमध्ये मतदानासाठी वापरलेली मतदान यंत्रे आणि मतमोजणीसाठी आवश्यक इतर मतदान साहित्य कडेकोट पोलीस बंदोबस्तात रात्री उशिरापर्यंत बालेवाडी येथे आणण्यात आले. त्यानंतर मतदान यंत्रांसह सर्व साहित्य सुरक्षारूममध्ये ठेऊन ही रूम लाखबंद करण्यात आली.

पनवेल विधानसभा मतदारसंघाकरीता १६३२ बॅलेट युनिट, ५४४ कंट्रोल युनिट आणि ५४८ व्हीव्हीपॅट यंत्रे, कर्जत विधानसभा मतदारसंघासाठी १०१७ बॅलेट युनिट, ३३९ कंट्रोल युनिट आणि ३४५ व्हीव्हीपॅट यंत्रे, उरण विधानसभा मतदारसंघासाठी १०३२ बॅलेट युनिट, ३४४ कंट्रोल युनिट आणि ३४६ व्हीव्हीपॅट यंत्रे, मावळ विधानसभा मतदारसंघासाठी ११७० बॅलेट युनिट, ३९० कंट्रोल युनिट आणि ३९६ व्हीव्हीपॅट यंत्रे, चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी १६४७ बॅलेट युनिट, ५४९ कंट्रोल युनिट आणि ५५६ व्हीव्हीपॅट यंत्रे, पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठी १२०० बॅलेट युनिट, ४०० कंट्रोल युनिट आणि ४०२ व्हीव्हीपॅट यंत्रे असे एकूण ७६९८ बॅलेट युनिट, २५६६ कंट्रोल युनिट आणि २५९३ व्हीव्हीपॅट यंत्रे वापरण्यात आली आहेत.

# नाशिक जिल्ह्यात सभांचा धडाका; नरेंद्र मोदींच्या सभेसाठी खास जलरोधक मंडपाची उभारणी



नाशिक – वादळी वाऱ्यासह वळिवाचा पाऊस हजेरी लावत असताना बुधवारी एकाच दिवशी जिल्ह्यात तीन बड्या नेत्यांच्या जाहीर सभा वेगवेगळ्या ठिकाणी होत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पिंपळगाव बसवंत येथे दुपारी होणाऱ्या सभेसाठी खास जलरोधक मंडपाची उभारणी करण्यात आली. तर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची शहरातील हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर होणारी सभा खुल्या मैदानात होणार आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांची वणी येथील मविप्र महाविद्यालयाच्या मैदानावर होणारी सभाही खुल्या मैदानात होईल. ठाकरे आणि पवार यांच्या सभेसाठी पावसापासून संरक्षणासाठी कुठलीही व्यवस्था करण्यात आलेली नाही.

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदार संघासाठी २० मे रोजी मतदान होत आहे. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात महायुती व महाविकास आघाडीकडून प्रचाराचा धडाका लावला जात आहे. त्याच अंतर्गत बुधवारी तीन प्रमुख नेत्यांच्या सभा वेगवेगळ्या भागात होत असून त्यांना मिळणाऱ्या प्रतिसादाकडे सर्वांचे लक्ष आहे. महायुतीचे नाशिक लोकसभेचे शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार हेमंत गोडसे, दिंडोरीतील भाजपच्या उमेदवार डॉ. भारती पवार आणि धुळ्याचे भाजपचे उमेदवार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पिंपळगाव बसवंत येथील शरदचंद्र पवार मुख्य बाजार आवारात सभा होत आहे.

पावसामुळे सभेत व्यत्यय येऊ नये म्हणून आवारात जलरोधक तंबुची उभारणी करण्यात आली आहे. ज्या ठिकाणी कांद्याचे लिलाव होतात, तिथे ही सभा होत आहे. दिंडोरीसह अनेक मतदार संघात कांदा निर्यातबंदी प्रचारात कळीचा मुद्दा ठरला आहे. सरकारने अलीकडेच सशर्त निर्यात खुली केली आहे. सभेत पंतप्रधान कांदा विषयावर काय बोलणार, याबद्दल उत्सुकता आहे.

महायुतीचे नेते, लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांनी सभा यशस्वी करण्यासाठी जय्यत तयारी चालविली आहे. छगन भुजबळ आणि गिरीश महाजन यांनी मंगळवारी बाजार समितीत येऊन तयारीचा आढावा घेतला. सभेच्या दिवशी वाहतुकीत अडथळा येऊ नये म्हणून पिंपळगाव बसवंत ते जोपुळेकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक सकाळी सात ते सायंकाळी पाच या वेळेत बंद ठेवली जाणार आहे. पोलिसांनी बाजार समितीचा ताबा घेतला असून सुरक्षेच्या दृष्टीने कडेकोट व्यवस्था केली जात आहे.

उद्धव ठाकरे, शरद पवार यांची खुल्या मैदानात सभा

महाविकास आघाडीचे नाशिक मतदारसंघातील उमेदवार राजाभाऊ वाजे यांच्या प्रचारार्थ शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा शहरातील हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर होत आहे. मंगळवारी सायंकाळी व्यासपीठ उभारणीचे काम प्रगतीपथावर होते. खुल्या मैदानात ही सभा होत आहे. सभेची संपूर्ण तयारी झाली असून ठाकरे यांच्यासोबत महाविकास आघाडीतील अन्य नेते उपस्थित असतील, असे ठाकरे गटाचे महानगरप्रमुख विलास शिंदे यांनी म्हटले आहे. महाविकास आघाडीचे दिंडोरी मतदार संघातील उमेदवार भास्कर भगरे यांच्या प्रचारार्थ सलग दोन दिवस शरद पवार यांची अनुक्रमे वणी व मनमाड येथे जाहीर सभा होत आहे. बुधवारी सायंकाळी सहा वाजता वणी येथील मविप्र संस्थेच्या महाविद्यालयाच्या मैदानात तर गुरुवारी सायंकाळी मनमाड बाजार समितीच्या प्रांगणात होणार आहे. या दोन्ही सभा खुल्या मैदानात होणार असल्याचे शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष कोंडाजीमामा आव्हाड यांनी सांगितले.


# पंचगंगा नदी प्रदूषणात आढळून आलेले मुद्दे उच्च न्यायालयाच्या याचिकेवेळी सादर करणार – दिलीप देसाई



कोल्हापूर : पंचगंगा नदी प्रदूषणाची दखल घेत कोल्हापूर बरोबरच इचलकरंजी शिरोळ येथे मंगळवारी सायंकाळी संयुक्त पाहणी करण्यात आली. या पाहणीनंतर बोलताना उच्च न्यायालयातील याचिकाकर्ते, प्रजासत्ताक सामाजिक संघटनेचे अध्यक्ष दिलीप देसाई यांनी आजच्या संयुक्त पाहणीमध्ये नदी प्रदूषित झाल्याचे दिसून आले आहे. याबाबत तयार करण्यात आलेल्या शासकीय अहवालात जे मुद्दे नोंद केले आहेत, ते पुरावे म्हणून उच्च न्यायालयात ६ जून रोजी होणाऱ्या सुनावणीवेळी सादर करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

गेल्या तीन दिवसापूर्वी इचलकरंजी येथील पंचगंगा नदीघाटावर काळे दुर्गंधीयुक्त पाणी येऊन मासे मृत्यूमुखी पडले होते, याबाबत वृत्तपत्रांनी दखल घेतली होती. त्यादरम्यानच्या पार्श्वभूमीवर काल जयंती नाला कोल्हापूर येथून विनाप्रक्रिया रासायनिक सांडपाणी पंचगंगेत सोडण्यात आल्याचे निदर्शनास आले होते. प्रजासत्ताक सेवा संस्थेचे दिलीप देसाई यांनी याबाबत उच्च न्यायलयात याचिका दाखल केली असून त्यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना सदर प्रदूषित पाण्याची पाहणी करून नमुने घेण्याची विनंती केली होती. त्या पार्श्वभूमीवर सकाळच्या सत्रात कोल्हापूर येथे नमुने घेतल्यानंतर दुपारच्या सत्रात पंचगंगेच्या शेवटच्या टोकावरील हेरवाड बंधाऱ्यावर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी सचिन हरभट, त्याचबरोबर नायब तहसीलदार योगेश जमदाडे, याचिकाकर्ते दिलीप देसाई इचलकरंजी महानगरपालिका पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुभाष देशपांडे यांनी भेट दिली. यावेळी तेरवाड बंधाऱ्यावरून फेसाळलेल्या काळयापाण्याचे नमुने घेण्यात आले. त्याचबरोबर इचलकरंजीतील काळा ओढा येथेही भेट दिली. तेथील दुर्गंधीयुक्त काळ्या पाण्याचे नमुने व तेच पाणी उसाच्या शेतीसाठी वापरण्यात येत असल्याचे निदर्शनास आले.

# ‘I never said Hindu or Muslim; I talked about poor families,’ says PM Modi



New Delhi - Slamming the Western media over the “negative” coverage of Indian elections, External Affairs Minister S Jaishankar said that the countries which “have to go to court for deciding election results” are giving “gyan” on conducting polls. The EAM was speaking at an interaction after the launch of the Bangla edition of his book ‘Why Bharat Matters’ in Kolkata on Tuesday.

Taking a swipe, he said the Western countries “feel” they have influenced the world for the last 200 years, so they are not able to give up their “old habits so easily.”


“They (Western countries) do want to influence us because many of these countries feel that they have influenced this world for the last 70-80 years...Western countries actually feel that they influenced the world for the last 200 years. How do you expect for someone who has been in that position to give up those old habits so easily,” the EAM said at the event.

He said that the Western media want a certain “class of people” to rule the country and feel “disturbed” when the Indian electorate doesn’t feel the same way. “Why these newspapers are so negative on India? Because they are seeing an India which is not in a sense compliant with their image of how India should be. They want people, ideology, or a way of life... they want that class of people to rule this country, and they are disturbed when the Indian population feels otherwise,” Jaishankar said.He also emphasized that the Western media at times “openly endorsed candidates and political parties.”

“Western media in some cases have openly endorsed candidates and political parties, they don’t hide their preference. They are very smart, somebody is doing this domination game for 300 years, they learn a lot, anubhavi log hain, chatur log hain (they are experienced and clever people),” the EAM said.

# Shockwaves in Delhi: Swati Maliwal case, AAP’s version, and options before cops





NEW DELHI: High-voltage drama unfolded at chief minister Arvind Kejriwal’s residence in north Delhi on Monday morning after Aam Aadmi Party’s Rajya Sabha MP, Swati Maliwal, claimed in a PCR call that she had been assaulted by Kejriwal’s personal assistant, Bibhav, on the former’s instructions. This brought the cops to the spot. Later, she went to the Civil Lines police station in order to file an FIR.

The Rajya Sabha MP, however, didn’t file any complaint. She reportedly received some phone calls, after which she left the station. She told the cops that she would return later but didn’t.

Bibhav and Swati have been with Kejriwal since his NGO days and their falling out has left a large section within AAP dismayed.

The falling out between the two is particularly concerning as Kejriwal prepares for the upcoming poll campaign. Another AAP’s Rajya Sabha member confirmed the incident on Tuesday, stating that “Bibhav Kumar misbehaved with her. This is a highly condemnable incident. Kejriwal has taken cognisance of it and will take strict action.”

Sanjay Singh addressed the issue at a press conference, praising Maliwal’s work for the country and society and emphasising that the party stands with her. He also indicated that the party wants to resolve the controversy quickly, with Kejriwal set to undertake a hectic campaigning. “CM has taken cognisance and AAP doesn’t support such people, we want to make it clear,” said Sanjay Singh.

BJP on the offensive

The BJP, on the other hand, has gone on the offensive, with Delhi BJP president Virendra Sachdeva questioning why arrests were not made immediately and why pressure was put on Maliwal to remain silent. Sachdeva demanded that an FIR be filed promptly based on Sanjay Singh’s statement and that those responsible be dealt with swiftly.

“Sanjay Singh’s statement should be the basis for immediate filing of an FIR by police and those guilty should be promptly dealt with. They are just talking about entrapping small fish, but in the end, who instigated this incident and what were the reasons? All these questions should be answered by Kejriwal,” said Sachdeva.

“The chief minister’s residence is famous for such incidents whether it was the incident involving a former chief secretary or Maliwal. This is the true character of AAP and it is now out in the open,” he said.

Options before the cops

The police have marked Maliwal’s complaint as “pending,” and no FIR has been filed yet. They are seeking legal opinion on whether they can proceed based on the DD entry and PCR call, a protocol followed in many cases. The police brass held a meeting on Tuesday evening to discuss the case, and attempts to contact Maliwal have been unsuccessful. Sources indicate that the police are in the process of collecting CCTV footage from outside the CM’s residence.

# Did you know the weight of Ghatkopar hoarding that killed 16 people?



MUMBAI: Deputy chief minister of Maharashtra, Devendra Fadnavis, has called for a thorough investigation into the tragic incident at Ghatkopar, where a billboard collapse claimed the lives of 16 individuals and left 44 others injured on Tuesday.

Weight and size

The hoarding that fell on the petrol station at Chheda Nagar in Ghatkopar was an illegal structure, weighing an astonishing 250 tonnes.

The size of the hoarding, measuring 120x120 sq ft, significantly surpassed the permissible dimensions set by the BMC, which allows for a maximum of 40x40 sq ft.

Bhavesh Bhinde, the owner of Ego Media, is facing charges of culpable homicide not amounting to murder. However, this is not the first time Bhinde has been in trouble with the law. According to police records, he has more than 20 cases registered against him, including a rape case.

Law enforcement officials have stated that Bhinde is currently evading arrest and his mobile phone is turned off, making it difficult to locate him.

In 2009, Bhinde ran for the state election as an Independent candidate from the Mulund constituency.

In his affidavit, he disclosed that there were 23 cases filed against him under various laws, such as the Mumbai Municipal Corporation Act and the Negotiable Instruments Act, which deals with bounced cheques.

# सचिन तेंडुलकरच्या घरी काम करणाऱ्या SRPF जवानाची राहत्या घरी आत्महत्या



● मुंबई, प्रतिनिधी :


सचिन तेंडुलकरकडे सुरक्षारक्षक म्हणून काम करणाऱ्या एका एसआरपीएफ जवानाने राहत्या घरी आत्महत्या केल्याची माहिती समोर येत आहे. प्रकाश कापडे असे या सुरक्षा रक्षकाचे नाव आहे. प्रकाश कापडे यांनी आपल्या राहत्या घरी स्वतःच्या डोक्यात गोळ्या झाडून आत्महत्या केल्याची घटना घडलीय. जळगाव जिल्ह्यात जामनेर याठिकाणी ही घटना घडली आहे. आत्महत्येचे कारण अद्याप समोर आलेले नाही.

प्रकाश कापडे हे मुंबईत सचिन तेंडुलकरच्या घरी सुरक्षा रक्षकाचे काम करत होते. पण आठ दिवसांपासून कापडे मुंबई येथून जामनेर येथे आपल्या गणपती नगर येथील घरी आले होते. गेली पंधरा वर्षा पासून ते एस आर पी एफ मध्ये कार्यरत होते. आज पहाटे त्यांनी ही आत्महत्या केली आहे. आत्महत्येचे कारण कळू शकले नाही,त्याचा पोलिस तपास करत आहेत. राहत्या घरी आत्महत्या केल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

गोळीबाराचा आवाज आल्यानंतर घरातील लोक धावत आले तेव्हा ते रक्ताच्या थारोळ्यात पडलेले आढळले. पंचनामा सुरू असून उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. आत्महत्येचे कारण अस्पष्ट आहे. तपास सुरू असून त्यानंतर कारण स्पष्ट होईल असे पोलीस म्हणाले. सचिन तेंडुलकरांच्या मुंबईतील बंगल्यात ते सुरक्षा रक्षक म्हणून कर्तव्य बजावत होते. बुधवारी पहाटेच्या सुमारास स्वतःच्या डोक्यात बंदुकीतून गोळी झाडून घेतली. त्यावेळी घरातील सर्व जण झोपले होते.

# पीओके हा भारताचा भाग, त्यावर आमचा अधिकार – अमित शाह

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :



पीओके हा भारताचा भाग आहे आणि त्यावर आमचा अधिकार आहे, असे भाजपाचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले आहे. दरम्यान, सध्या देशात लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी एएनआयला मुलाखत दिली. यावेळी पीओके हा भारताचा भाग आहे आणि त्यावर आमचा अधिकार आहे, ते कोणीही नाकारू शकत नाही, असे अमित शाह म्हणाले.

फारुख अब्दुल्ला आणि काँग्रेसचे नेते आज पाकिस्तानकडे अणुबॉम्ब असल्याचे सांगत आहेत. पीओकेची मागणी करत नाहीत. मला त्यांना विचारायचे आहे की, १३० कोटी लोकसंख्येचा देश कोणाच्या तरी भीतीने आपले हक्क सोडणार का? राहुल गांधींनी पाकिस्तानच्या सन्मानाबद्दल बोलून त्यांच्या पक्षाच्या लोकांना काय म्हणायचे आहे ते सांगावे? असा सवाल करत अमित शाह यांनी काँग्रेसवर निशाणा साधला.

याचबरोबर, सर्वोच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना अंतरिम जामीन मंजूर केल्याबद्दल अमित शाह म्हणाले, "हा काही नियमित निर्णय नाही, असे मला वाटते. या देशातील अनेक लोकांचा म्हणणे आहे की, स्पेशल ट्रिटमेंट देण्यात आली आहे". तसेच, अमित शाह यांना अरविंद केजरीवाल यांच्या सुटकेबद्दल आणि इंडिया आघाडीच्या प्रचाराविषयी विचारण्यात आले. यावेळी अमित शाह म्हणाले, "सध्या ते (अरविंद केजरीवाल) दुसऱ्या प्रकरणात अडकले आहेत (स्वाती मालीवाल यांच्यावरील हल्ला प्रकरण), त्यांना यातून मुक्त होऊ द्या. बघूया काय होते ते." काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या वायनाड (केरळ) आणि रायबरेली (उत्तर प्रदेश) मधून लोकसभा निवडणूक लढवण्याबद्दल अमित शाह म्हणाले, "कोणीही कोठूनही निवडणूक लढवू शकतो, पण राहुल गांधींनी निवडणुकीपूर्वीच सांगायला हवे होते की, ते दोन जागांवर निवडणूक लढवणार आहेत. लोकशाहीच्या दृष्टिकोनातून ते लपवणे योग्य नाही असे मला वाटते. त्यांनी वायनाडच्या लोकांना त्याबद्दल सांगायला हवे होते, जेव्हा तुम्ही मतदानोत्तर सर्वेक्षणात धोका पाहता आणि मग तुम्ही रायबरलीला येता, हे मला योग्य वाटत नाही."

## "आमचे जीव घेण्याचा अधिकार... "; अभिनेता शशांक केतकरने

# घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेवरुन व्यक्त केला संताप

● मुंबई, प्रतिनिधी :





अभिनेता शशांक केतकरने मालिकांसह चित्रपटांमध्ये देखील काम केले आहे. सोशल मीडियावर देखील तो सक्रिय असल्याचे दिसते. अनेक सामाजिक विषयांवर तो परखडपणे आपले मत व्यक्त करताना दिसतो. नुकत्याच घडलेल्या घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेवर शशांक एक व्हिडिओ शेअर करत संताप व्यक्त केला आहे.

शशांकने इन्स्टाग्रामवर व्हिडिओ शेअर करत म्हंटले की, "काल मुंबईतील वादळामुळे १२० फूट १२० फूट मोठं होर्डिंग पेट्रोल पंपावर पडले. दुर्दैवाने त्यावेळी पाऊस पडत असल्याने काही जणांनी पेट्रोल पंपाखाली आसरा घेतला होता. मात्र हा बोर्ड त्यांच्या अंगावर पडला आणि जे घडू नये ते घडलं. आजचा मृतांचा आकडा १४ आहे. मुळात फक्त ४० बाय ४० फूट बोर्ड लावण्याची परवानगी असताना हा बोर्ड उभा राहिलाच कसा? एखाद्या फ्लायओवरवर सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत, हे असं कसं असू शकतं. म्हणजे एखादा अपघात झाला तर तुम्ही तो कव्हर कसा करणार? कोण चूक, कोण बरोबर? हे कसं ठरवलं जाणार? ", असा सवालही त्याने केला.

> "ही एक नैसर्गिक आपत्ती होती. यात कोणाचाही सहभाग नव्हता. आपल्या देशाची लोकसंख्याच इतकी आहे की आपल्या जगण्याची, जीवाची फार किंमतच नाही. हे पुन्हा पुन्हा दिसून येतंय. गेल्या काही वर्षात देशात खूप चांगली प्रगती होत आहे, वेगवेगळ्या लेव्हलवर आपण प्रगती करत आहोत, याचं कौतुकच आहे. परंतु अनेक गोष्टी सुधारणं खूप गरजेचे आहे."

पुढे शशांक म्हणाला, "मी ठाण्यात राहतो. मी रोज मढहून घोडबंदरला जातो. त्या घोडबंदर रोडला चौपाटी तयार होते. हे चांगले नाही. रस्त्यावरील वाहने वाढली आहेत, लोकसंख्या वाढली आहे. मग रस्ते वाढवण्याचे काम पटापट व्हायला नको का? ही जबाबादारी कुणाची? कुणाचं सरकार, कुठली महानगरपालिका याच्याशी मला घेणदेण नाही. ही सत्तेत असलेल्या प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. यावर मला कुठल्याच राजकीय पक्षाला किवा राज्यकर्त्याला काहीच म्हणायचं नाही."

# शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांना निवडणूक आयोगाची नोटीस

● मुंबई, प्रतिनिधी :



मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदार संघासाठी महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी आमदार रवींद्र वायकर यांनी उद्धव ठाकरेंची साथ सोडली आणि त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. वायकर यांच्या शिंदे गटातील प्रवेशानंतर त्यांना महायुतीकडून लोकसभेची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. यानंतर आता पुन्हा एकदा वायकर चर्चेत आले आहे. महायुती शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रवींद्र वायकर यांना निवडणूक आयोगाने नोटीस बजावली आहे.

निवडणूक खर्चातील तफावत आढळल्यामुळे त्यांना निवडणूक आयोगाने नोटीस पाठवली आहे. खर्चातील तफावत स्पष्ट करण्यासाठी त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी वंदना सूर्यवंशी यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघातील उमेदवारांच्या दैनंदिन खर्च नोंदवहीची निरीक्षकांसमोर १३ मे रोजी द्वितीय तपासणी करण्यात आली होती. तेव्हा २१ उमेदवारांपैकी १९ उमेदवारांनी खर्च सादर केले होते. यावेळी उमेदवार रवींद्र वायकर यांना खर्चातील तफावतीबाबत नोटीस देण्यात आली आहे. दरम्यान, उद्धव ठाकरे यांची अचानक साथ सोडल्याने ठाकरे गटाकडून रवींद्र वायकरांना नोटीस बजावण्यात आली होती. रवींद्र वायकर हे आमदार आहेत. त्यामुळे आम्ही तुम्हाला अपात्र का करू नये? अशी नोटीस ठाकरे गटाने रवींद्र वायकर यांना पाठवली आहे. यासंदर्भात विधानसभा अध्यक्षांनाही पत्र देण्यात येणार असलयाचे सांगण्यात आले होते. आता मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघात वायकर हे ठाकरे गटाचे अमोल कीर्तिकर यांच्या विरोधात लढणार आहेत, ज्यांचे वडील गजानन कीर्तिकर हे शिंदे गटात आहेत.

## मी हुकूमशाही नाही तर मर्दासारखा लढतो, गल्लीची शिट्टी दिल्लीला वाजणारच – आम.हितेंद्र ठाकूर



● विरार प्रतिनिधी :

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी केलेल्या आरोपांचे प्रत्युत्तर देण्यासाठी बविआ अध्यक्ष आणि आमदार हितेंद्र ठाकूर यांनी बुधवारी सकाळी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यात त्यांव पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्यावर पैसे गोळा करण्याचे आरोप केले आहेत. मी हुकूमशाही नाही करत मी मर्दासारखा लढतो, गल्लीतील शिट्टी ही दिल्लीला वाजणारच असे बोलत वसईकरांना निपटून टाकू ते काय गाजर, मुळी आहे का ? राज्यसभा आणि विधानपरिषदसाठी वसईला का आले होते असा समाचार घेत ठाकुरांनी घणाघात केला आहे. कंत्राटदार, मनपा आणि पीडब्ल्यूडी अधिकारी यांना प्रत्येकी २० कोटी रुपये पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी मागितले असल्याचा गंभीर आरोप हितेंद्र ठाकुरांनी केला आहे. लाईट, पाणी बंद करण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव टाकायचा आणि बहुजन विकास आघाडीचे नाव बदनाम करण्याचा अजेंडा सेना, बीजेपीने चालविला असल्याचा आरोपही त्यांनी केला. चिटिंग करून लढण्यापेक्षा चांगल्या मनाने, इमानदारीने माझ्यासोबत लढा. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री, मुलगा पर्यावरण मंत्री आणि सुभाष देसाई उद्योग मंत्री होते मग वाढवण बंदर का रद्द केले नाही ? आता विरोध दाखवायचा ही फक्त नाटके असल्याचा आरोप करत ठाकरे सेनेचाही समाचार घेतला. ते वसईला काय निपटवणार मी त्यांना निपटवणार असा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ठाकुरांनी हल्ला केला आहे.

# गाई चोरल्याच्या संशयातून एकाची हत्या, तिघांना अटक

● नवी मुंबई प्रतिनिधी :



अडवली भुतवली येथील पारधी वस्तीमध्ये एकाची हत्या झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली असून त्याच्यावर रबाळे एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत व्यक्तीने गाई चोरल्याचा संशयातून त्याला मारहाण केल्याचे तिघांनी मान्य केले आहे.

रबाळे एमआयडीसी पोलिस ठाणे हद्दीत मंगळवारी हा प्रकार घडला आहे. त्याठिकाणी राहणाऱ्या ठाकूर (४५) नावाच्या व्यक्तीचा मृतदेह राहत्या घरात मिळून आला होता. याची माहिती मिळताच रबाळे एमआयडीसी पोलिसांनी त्याठिकाणी धाव घेतली. पाहणीमध्ये या व्यक्तीच्या शरीरावर जखमा दिसून आल्या होत्या. त्यावरून पोलिसांनी अधिक चौकशी केली असता तिघांनी त्यांना रिक्षात कोंबून अपहरण करून नेले होते असे समोर आले. त्यानंतर काही वेळानी पुन्हा त्यांनीच मृत अवस्थेतील ठाकूर यांना राहत्या घरात टाकून पळ काढला होता. त्याद्वारे पोलिसांनी शिरवणे एमआयडीसी परिसरातील दोन तबेले चालक व एक रिक्षाचालक अशा तिघांना अटक केली आहे.

उमाकांत गौड (५१), जयप्रकाश गौड (२५) व नागेश इंगळे (१९) अशी त्यांची नावे आहेत. उमाकांत याच्या तबेल्यातून काही महिन्यांपूर्वी तीन गाई चोरीला गेल्या होत्या. या गाई अडवली भुतवली येथील पारधी वस्तीत राहणाऱ्या ठाकूर याने चोरल्याचा त्यांना संशय होता. यातून त्यांनी त्याच्या अपहरणाचा कट रचून रिक्षातून निर्मनुष्य ठिकाणी नेले. त्याठिकाणी केलेल्या मारहाणीत मृत्यू झाल्यानंतर मृतदेह पुन्हा त्यांच्या घरात टाकून पळ काढला होता. त्यानुसार तिघांनाही अटक केली असल्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय पाटील यांनी सांगितले. ठाकूर हे त्याठिकाणी एकटेच रहायला होते. परिसरातील तबेल्यांमध्ये मिळेल ते काम करून उपजीविका भागवायचे. मात्र त्यांची पूर्ण ओळख पटेल असा कोणताही कादोपत्री पुरावा पोलिसांच्या हाती लागलेला नाही.

## चारचाकी वाहनातून गावठी दारूची वाहतूक; १ लाख ५३ हजार ६५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त



● पिपरी प्रतिनिधी :

दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये अवैध दारू वाहतूक तसेच विक्री प्रकरणी राज्य उत्पादन शुल्कच्या (एक्साइज) तळेगाव दाभाडे विभागाने कारवाई केली. यात एक लाख ५३ हजार ६५५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शिरगाव येथे केलेल्या कारवाईत नीलेश ज्ञानेश्वर पवार (३५, रा. गोडुंब्रे, ता. मावळ) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. एक्साइजच्या तळेगाव दाभाडे विभागाचे निरीक्षक संजय सराफ यांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ मे रोजी शिरगाव येथे गहुंजे रस्त्यावर अवैध गावठी दारूची वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार एक्साइजच्या तळेगाव दाभाडे विभागाच्या पथकाने सापळा लावला. त्यावेळी एक संशयित चारचाकी वाहन थांबवले. वाहनामधून ३५ लिटरच्या आठ प्लास्टिक कॅनमध्ये २८० लिटर गावठी दारू जप्त केली. यात एकूण एक लाख ४८ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

■ दुसऱ्या कारवाईत खेड तालुक्यातील वासुली गावच्या हद्दीतील हॉटेल राजदरबार येथे अवैधरित्या देशी-विदेशी मद्याची विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार एक्साइजच्या तळेगाव दाभाडे पथकाने छापा मारला. यात अवैध देशी-विदेशी मद्याची विक्री सुरू असल्याचे आढळून आले. यामध्ये चार हजार ८५५ रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. यामध्ये राजेश दगडोबा घोनशेठवाड (४२, रा. हॉटेल राजदरबार, वासुली, ता. खेड) याच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

■ एक्साइजचे अधीक्षक चरणसिंग राजपूत, उपअधीक्षक सुजित पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एक्साइजच्या तळेगाव दाभाडे विभागाचे निरीक्षक संजय सराफ, दुय्यम निरीक्षक प्रवीण गाडगे, प्रशांत रुईकर, सहायक दुय्यम निरीक्षक रवि लोखंडे, जवान शिवाजी गळवे, रसूल काद्री, अविनाश दिघे, प्रदीप गवळी, अमोल अन्नदाते यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# छत्रपतींचा अपमान करणाऱ्या महाराष्ट्रद्रोह्यांना मराठी माणूस धडा शिकवेल; काँग्रेसची घणाघाती टीका

● मुंबई, प्रतिनिधी :



लोकसभा निवडणुकीसाठी पंतप्रधान मोदी यांनी वाराणसीतून आपला उमेदवारी अर्ज भरला. याशिवाय मोदी देशभरात विविध सभा, रोड शो करताना दिसत आहेत. याचदरम्यान राष्ट्रवादीचे प्रफुल्ल पटेल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जिरेटोप घालून त्यांचे स्वागत केले. या कृतीनंतर महाविकास आघाडी आक्रमक झाली असून यावर आक्षेप नोंदवला जात आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने याबाबत ट्विट करण्यात आले होते. त्यानंतर आता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी यावर टीकास्त्र सोडले आहे.

"हिंदुस्थानचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षाकडून सातत्याने केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभा खासदार प्रफुल्ल पटेल यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या डोक्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा जिरेटोप चढवून छत्रपती शिवाजी महाराज व त्यांना मानणाऱ्या करोडो शिवभक्तांचा अपमान केला आहे. या अपमानाबद्दल प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर माफी मागावी", अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

> "अयोध्यातील राम मंदिर उद्घाटन सोहळ्यातही श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष गोविंदगिरी महाराजांनी नरेंद्र मोदी यांची तुलना छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी केली होती. असे प्रकार शिवाजी महाराजांचा अपमान करणारे आहेत, त्याला आळा घातला पाहिजे पण त्यात भरच पडत आहे. अंडरवर्ल्ड माफिया दाऊद इब्राहिमचा निकटवर्तीय इकबाल मिर्चीसोबत खासदार प्रफुल्ल पटेल यांनी जमीन व्यवहार केल्याप्रकरणी ईडीकडून चौकशी झाली होती. देशद्रोह्याची संबंध असलेल्या प्रफुल्ल पटेलचे पापी हात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिरेटोपला लागले हे लाजिरवाणे आहे. या घटनेचा काँग्रेस पक्ष तीव्र शब्दात निषेध करत आहे", असेही नाना पटोलेंनी ठणकावून सांगितले.

ते पुढे म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहेत पण या दैवताचा सातत्याने अपमान केला जात आहे. तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, भापजाचा प्रवक्ता सुधांशु त्रिवेदी, मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्यासह अनेकांनी महाराजांचा अपमान केला पण भारतीय जनता पक्षाने त्यावर चकार शब्द काढला नाही."